मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव

साप्ताहिक

# युवक आधार

PRGI NO.MHMAR/26/A3475

मुख्य संपादक ; श्री.मुकुंद शंकर कांबळे

● सह संपादक - श्री. निजाम सय्यद ● उप संपादक - श्री. किशोर गुडेकर

■ वर्ष : १ ■ अंक : ०३ ■ मंगळवार, ०४ ऑगस्ट ते सोमवार १० ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४

## इयत्ता अकरावी प्रवेशासाठी ४ ऑगस्टपासून विशेष फेरी

### विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक करण्याचे आवाहन

**मुंबई :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सुमारे १२.९८ लाख विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. अद्याप काही विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्याने त्यांच्यासाठी ४ ऑगस्ट २०२६ पासून विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.विशेष फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने किमान १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरून अर्ज लॉक करणे आवश्यक राहणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम आणि गुणवत्तेनुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वाटप करण्यात येणार आहे. या विशेष फेरीसाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच भाग-१ मधील आवश्यक दुरुस्ती करण्याची सुविधा ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध राहील. याच कालावधीत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम भरून अर्ज अंतिम स्वरूपात लॉक करता येणार आहे.विशेष फेरीतील प्रवेश वाटप प्रक्रिया ७ ऑगस्ट रोजी पार पडणार असून ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता प्रवेश वाटपाची यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारेही माहिती पाठविण्यात येणार आहे. प्रवेश वाटप झालेल्या विद्यार्थ्यांना ८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजल्यापासून १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात आवश्यक कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करता येईल. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.दरम्यान, इतर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपला अर्ज मागे घेण्याचे आवाहनही शिक्षण संचालनालयाने केले आहे.

# लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठे येथे समाजोपयोगी वस्तूंचे वाटप





### गरजू नागरिक, ज्येष्ठ आणि विद्यार्थ्यांना मदतीचा हात; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून उपक्रमाचे कौतुक

**साप्ताहिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

नेत्याची खरी ताकद ही त्याच्या कार्यकर्त्यांमध्ये असते. कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या उपक्रमांमुळे पक्षाची ताकद अधिक मजबूत होते. जयेंद्र जोशी आणि रवींद्र जोशी यांनी आयोजित केलेल्या समाजोपयोगी उपक्रमातून हीच सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देण्याऐवजी तसेच बॅनर लावण्याऐवजी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत जयेंद्रशेठ जोशी युवा मंच आणि रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे सेक्टर ३६ येथील मसाला मंत्रा हॉल येथे समाजोपयोगी वस्तूंच्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन लाभार्थ्यांना वस्तूंचे वाटप केले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमांतर्गत गरजू नागरिकांना मधुमेह तपासणी किट, ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन वापरासाठी वॉकिंग स्टिक, तर शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. परिसरातील शेकडो नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

त्यामुळे गरजू नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळाला.

कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेवक रवी जोशी, डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, प्रदीप भगत, हॅप्पी सिंग,नगरसेविका शीला भगत, हेमलता गोवारी, आयोजक जयेंद्र जोशी, राजेश गायकर, हर्षवर्धन पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.












# वाढवण बंदर खाण प्रकल्पाच्या जन सुनावणी मध्ये आंदोलकांचा गोंधळ

## दगड उत्खननासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केली होती जन सुनावणी

**सा.युवक आधार**

**पालघर/ प्रतिनिधी** : खोल समुद्रामध्ये उभारण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी वाढवण बंदराच्या उभारणीसाठी समुद्रात भराव करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक गौण खनिजांचे उत्खनन करण्यात येणार आहे. पालघर तालुक्यातील गारगाव आणि खाणीवडे या नजीकच्या दगड खाणींमधून दगडाचे उत्खनन करण्यात येणार आहे. सदर बाबीच्या पर्यावरणीय मंजुरीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या वतीने जाहीर सुनावणीचे आयोजन रविवार दिनांक 2 ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. यावेळी प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या तज्ञ मंडळींच्या अहवालावरून आणि जन सुनावणी पुढे ढकलण्याच्या मुद्द्यावरून आंदोलकांनी जन सुनावणीत गोंधळ घातला.

गारगाव आणि खाणीवडे या नजीकच्या दगड उत्खननामुळे पर्यावरणावर त्याचा होणारा परिणाम आणि या प्रक्रियेमुळे स्थानिकांच्या जीवनमानावर होणारा बदल याबाबत मंडळाकडून एक अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवाल अध्ययनासाठी दिलेला कालावधी अपुरा असल्याचे प्रथमतः आंदोलकांच्याकडून सांगण्यात आले. सदर अहवाल मराठी मध्ये आणि त्याचा मतितार्थ संक्षिप्त रूपात सादर करण्याचे प्रशासनाने आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी त्याला देखील नकार दिला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने रविवारी शिगाव- खुताड येथे जाहीर जन सुनावणी आयोजित केली होती. या जनसुनावणीत आंदोलकांनी तज्ञ मंडळींच्या अहवाला सोबतच अतिवृष्टी आणि शेतीची कामे सुरू असताना जन सुनावणी का घेतली? असा सवाल उपस्थित केला. दगडखणींमधून होणाऱ्या उत्खननाचा संभाव्य जीवनमानावरील आणि पर्यावरणावरील परिणाम याबाबत तयार केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने आजूबाजूच्या पाच ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना या सुनावणीसाठी निमंत्रित करण्यात आले होते.

अतिवृष्टी आणि शेतीची कामे यांची कारणे देत जन सुनावणी रद्द करून पुढे ढकलण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली होती.



गारगाव गट क्रमांक ८२ (क्षेत्र.२४.९४ हे.) साठी आयोजित सुनावणीमध्ये ९० नागरिक, गट क्रमांक ८२ (क्षेत्र.१७.०८ हे.) साठी ७२ आणि खानिवडे गट क्रमांक ९ (क्षेत्र.१५.३९ हे.) ६० ते ७० नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध पर्यायांना आंदोलकांनी धुडकारले. जन सुनावणीच्या सभा मंडपा बाहेर येऊन त्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. पोलीस प्रशासनाने त्यांची समजूत काढल्यानंतर देखील आंदोलन सुरूच राहिले. अखेरीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने जन सुनावणीचा कारभार सुरू करण्यात आला. यादरम्यान कुठलीही पोलिसी कारवाई होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घेतली. जन सुनावणीचा कारभार सुरू असलेला पाहता घोषणाबाजीचे रूपांतर गोंधळबाजी मध्ये झाले.

तुमच्या हरकती व सूचना लिखित अथवा कथित स्वरूपामध्ये प्रशासनाकडे नोंदवा अशी पोलिसांच्या वतीने वारंवार विनंती करण्यात आली. एकंदरीतच जन सुनावणी उधळून लावण्याचा आंदोलकांचा मानस होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकंदरीत झालेल्या घडामोडींची नोंद घेऊन जन सुनावणी पूर्ण केली.पोलिस प्रशासनाने देखील सर्व आंदोलकांच्या मागण्यांची नोंद केली.

प्रशासनाच्या वतीने जन सुनावणी मध्ये ग्रामस्थांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने सादर करण्यात आलेला तज्ञ मंडळींचा अहवाल इंग्रजीमध्ये असून तो फार मोठा आणि क्लिष्ट असल्याचा आरोप उपस्थित ग्रामस्थांनी केला. त्यावर मंडळाच्या वतीने तो मराठीमध्ये व संक्षिप्त स्वरूपात तुम्हाला सादर करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले ते देखील ग्रामस्थांनी झिडकारले. सुनावणी मध्ये अपेक्षित समस्या निराकरण करण्यासाठी शक्य ते प्रयत्न करण्यात आल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

---

## स्वत: च्या खाजगी वाहनावर लाल रंगात पोलीस पाटी लावली तर खबरदार – अपर पोलीस महासंचालक

**सा.युवक आधार**

**किशोर गुडेकर मुंबई-** स्वतः च्या खाजगी वाहनावर पोलीस नावाची लाल पाटी लाऊन फिरणाऱ्या पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच सेवानिवृत्त अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे आदेश डॉ. सुनील भारद्वाज पोलीस अधीक्षक अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) मुंबई यांनी दिले. या पुढे पोलीस असी पाटी लावणाऱ्यांना पोलीस पाटी काढावी लागणार. राज्यातील बरेचसे पोलीस अधिकारी, अंमलदार, तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आपल्या खाजगी वाहनावर पोलीस असी लाल रंगाची पाटी अथवा पोलीस लाल अक्षरात लिहून त्यांचे खासगी वाहन वापरत असतात. यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन होत आहे. या वर उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असून या बाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. पोलीस पाटी असल्याने ते वाहन चेक होत नाही, पार्किंग लागत नाही, टोल लागत नाही. तसेच हे वाहन चेक होत नसल्याने कोणतेही अवैध काम होतात. गैर प्रकारही होतात. पण असा वाहनावर निर्बंध घालून पोलीस नावाची पाटी लावणाऱ्या चालकाविरुद्ध कार्यवाही करण्यास गंभीरतेने दखल घेतली जात नव्हती. म्हणुन माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सखाराम कुलकर्णी यांनी दि.२७ जुलैला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तक्रारीचे निवेदन देऊन पोलीस नाव लिहिण्यास निर्बंध घालण्याची विनंती केली. या निवेदनाची दखल घेऊन अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) मुंबई कार्यालयाने दखल घेऊन डॉ. सुनील भारद्वाज पोलीस अधीक्षक यांनी दिन.३१ जुलैला कार्यवाही करण्याचे आदेश राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक, महामार्ग अधीक्षक व सर्व पोलीस आयुक्त यांना दिले. पोलीस पाटी अथवा पोलीस नाव लिहिलेले वाहन आढळून आल्यास त्यांचे विरुद्ध कलम १३३(६) महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ सह कलम १७७ मोटार वाहन कायदा १९८८ अन्वये उचित कार्यवाही करण्यात यावी असे आदेशात नमूद केले आहे. या आदेशामुळे आता तरी पोलीस पाटीवर निर्बंध येतील असी प्रतिक्रिया तक्रारदार सखाराम कुलकर्णी यांनी दिली.

---

## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भव्य 'मूट कोर्ट'चे नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते बुधवारी उद्घाटन

**सा. युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेलच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ च्या भव्य मूट कोर्टचा उद्घाटन समारंभ बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता खांदा कॉलनी येथे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे असणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहून म्हणून पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा




परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने शिक्षणाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य उभे केले असून, उच्च शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा सातत्याने भर राहिला आहे. संस्थेने १९९२ मध्ये आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात केली असून आज विविध शैक्षणिक शाखांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार केला जात आहे. भगुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ हे संस्थेच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल असून, कायद्याच्या विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, त्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडावी आणि भविष्यातील कायदेपेशासाठी त्यांची सक्षम तयारी व्हावी, या उद्देशाने मूट कोर्ट सारख्या आधुनिक सुविधेला महत्व आहे. भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ या कॉलेजची स्थापना शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये करण्यात आली असून ते मुंबई विद्यापीठाशी संलग्न आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेखाली कार्यरत आहे. तरी हितचिंतक नागरिक, पालकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य परेश ठाकूर यांनी केले आहे.

---

## पनवेलजवळ अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला; नातेवाईकांचा शोध सुरू

**सा. युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विसावा रिसॉर्टच्या मागील डोंगरावरील झुडपांमध्ये एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यू दाखल केला असून मृताची ओळख पटविण्यासाठी नागरिकांचे सहकार्य मागितले आहे.पोलिसांनी दिलेल्या



माहितीनुसार, सदर मृतदेह आढळून आला. मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून, अंगाने मध्यम बांधा, गोल चेहरा, काळे केस, छातीवर टिळा गोंदलेला तसेच उजव्या हातावर लाल रंगाचा दोरा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मृताच्या अंगात राखाडी रंगाची हाफ पँट होती. या प्रकरणाचा तपास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोणे (मो. ९०९६९२३६०७) करीत आहेत. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून, मृताची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

या अनोळखी व्यक्तीबाबत कोणाला कोणतीही माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (फोन : ८६९७६४९९९२) किंवा तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोणे (मो. ९०९६९२३६०७) यांच्याशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

---

## तोडलेल्या झाडांच्या फांद्या फुटपाथवरच

**सा. युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिका हद्दीत पावसाळ्यात तोडलेल्या झाडांच्या फांद्या नवीन पनवेल सेक्टर 5, 8, 9 10 परिसरातील फुटपाथवरच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या झाडांच्या फांद्या लवकरात लवकर उचलाव्यात अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.



तोडलेल्या झाडांच्या फांद्या अनेक ठिकाणी फुटपाथवरच टाकून देण्यात आल्याने पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. येथील फुटपाथ तोडलेल्या फांद्यांनी अडवल्यामुळे नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत असून त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. पनवेल महापालिकेकडून किंवा संबंधित ठेकेदारामार्फत झाडांची छाटणी केल्यानंतर फांद्या तात्काळ उचलून नेणे अपेक्षित असते. मात्र अनेक ठिकाणी दिवसेंदिवस या फांद्या फुटपाथवरच पडून असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी तर फांद्यांचे मोठे ढिगारे झाल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्तींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे फुटपाथवरील फांद्या तातडीने हटवून फुटपाथ मोकळे करण्याची मागणी केली आहे.

---

# पाण्याने भरलेल्या खड्ड्यांत खडी टाकून डागडुजी!

■ वावोशीफाटा –परखंदे रस्त्यावर ग्रामस्थांनी कामच रोखले' भविष्यात मोठं आंदोलन करणार

■ अभियंता गैरहजर, निकृष्ट कामाचा आरोप; तांत्रिक तपासणीशिवाय काम सुरू करू नका, अन्यथा आंदोलनाचा इशारा – बायपास शस्त्रक्रिया झालेले उदयोजक रविंद्र टिळक यांचा आमरण उपोषणाचा निर्धार

**सा.युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या वावोशी–परखंदे रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामावर रविवारी सकाळी ग्रामस्थांनी आक्षेप घेत काम थांबविल्याची घटना घडली. पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यांमध्ये थेट खडी टाकून फावड्याच्या सहाय्याने ती पसरवून डागडुजी केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे, हे काम सुरू असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही अभियंता अथवा अधिकृत तांत्रिक निरीक्षक घटनास्थळी उपस्थित नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी पावसाळ्यात याच पद्धतीने तात्पुरती डागडुजी केली जाते. काही दिवसांतच खडी वाहून जाऊन रस्ता पुन्हा पूर्ववत खड्डेमय होतो. त्यामुळे ही कायमस्वरूपी दुरुस्ती नसून केवळ थातूरमातूर काम असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. यावेळी वावोशी येथील ग्रामस्थ अजित मोरे, पत्रकार जतिन मोरे, हनुमंत मोरे आणि सतीश शेवाळे यांनी घटनास्थळी जाऊन सुरू असलेल्या कामावर आक्षेप घेतला. संबंधित विभागाचा अभियंता उपस्थित नसताना आणि कामाची तांत्रिक तपासणी न करता डागडुजी केली जात असल्याचे सांगत त्यांनी काम थांबविण्याची मागणी केली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांचा मोबाईल फोन बंद असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. ग्रामस्थांनी मागणी केली



की, संबंधित विभागाचा जबाबदार अभियंता प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहावा, वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता तपासावी आणि सर्व तांत्रिक बाबींची खात्री करूनच रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करावे. अन्यथा निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, वावोशी येथील सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ ग्रामस्थ तथा उद्योजक रविंद्र टिळक यांनीही या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

नुकतीच त्यांची बायपास शस्त्रक्रिया झाली असून हृदयातील ९९ टक्के ब्लॉकेजमुळे डॉक्टरांनी खराब रस्त्यावर प्रवास टाळण्याचा सल्ला दिल्याचे त्यांनी सांगितले. तरीही या रस्त्यामुळे स्वतःच्या

'आमचा विरोध रस्ता दुरुस्त करण्याला नाही, तर दरवर्षी होणाऱ्या निकृष्ट आणि तात्पुरत्या डागडुजीला आहे. पाण्याने भरलेल्या खड्ड्यांत खडी टाकून रस्ता टिकणार नाही. मूळ कंत्राटदाराकडूनच तांत्रिक निकषांनुसार दर्जेदार काम पूर्ण करून घ्यावे आणि दोषींवर कारवाई करावी.'

- अजित मोरे, ग्रामस्थ - वावोशी फाटा

'सुमारे ₹१.७८ कोटी खर्च करून तयार झालेल्या रस्त्याची आजची अवस्था अत्यंत दुर्दैवी आहे. माझी बायपास शस्त्रक्रिया झाली असून डॉक्टरांनी खराब रस्त्यावर प्रवास करू नका, असा सल्ला दिला आहे. तरीही या रस्त्यावरून प्रवास करणे भाग पडत आहे. प्रशासनाने आता तरी जागे होऊन नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवावा. अन्यथा दर्जेदार रस्त्यासाठी मी आमरण उपोषण करण्यासही मागे-पुढे पाहणार नाही.'

- रविंद्र टिळक
(सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ ग्रामस्थ तथा उद्योजक)

'सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कोणत्याही रस्त्याच्या कामावेळी संबंधित शासनाचा अभियंता किंवा अधिकृत तांत्रिक अधिकारी घटनास्थळी उपस्थित असणे आवश्यक आहे. काम कोणत्या पद्धतीने होत आहे, कोणते साहित्य वापरले जात आहे आणि तांत्रिक निकषांचे पालन होत आहे की नाही, यावर नागरिकांनीही लक्ष ठेवले पाहिजे. दर्जेदार काम हा प्रत्येक नागरिकाचा हक्क असून, त्यासाठी नागरिकांनी जागरूक राहून प्रश्न विचारणे आणि आवश्यक तेथे आक्षेप नोंदवणे ही लोकशाहीतील सामूहिक जबाबदारी आहे.'

- पत्रकार जतिन मोरे, वावोशी

आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याचे नमूद करत, नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार रस्ता मिळावा यासाठी आवश्यक असल्यास आमरण उपोषण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

वावोशी–परखंदे रस्त्याच्या निकृष्ट अवस्थेबाबत यापूर्वीही अनेक वेळा तक्रारी, निवेदने आणि वृत्तमाध्यमांद्वारे पाठपुरावा करण्यात आला आहे. त्यामुळे आता संबंधित विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण रस्त्याची तांत्रिक पाहणी करून दर्जेदार व कायमस्वरूपी काम करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

साप्ताहिक युवक आधार ( PRGI NO.MHMAR/26/A3475 ) हे पत्रक मालक भारती संतोष आमले, प्रकाशक संतोष शिवदास आमले तसेच मुद्रक शितल वसंत कोलते यांनी सिद्धि प्रिंटर्स, Q203 इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय Q203 इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक अनुराग संतोष आमले.

WEEKLY YUVAK ADHAR (PRGI NO MHMAR/26/A3475) OWNER BY BHARTI SANTOSH AMALE PUBLISHED BY SANTOSH SHIVDAS AMALE AND PRINTED AT SIDDHI PRINTERS, MALMATTA KRAMANK 278 MANGAL GATE, MANGAL NAGAR, MALKAPUR, BULDHANA, MAHARASHTRA - 443101 AND PUBLISHED AT Q/203, INRAPRASTH SOCIETY, ADAIGAON NEW PANVEL, RAIGAD, MAHARASHTRA - 410206. EDITOR ANURAG SANTOSH AMALE.

# कळंबोलीत वृक्षदिंडी व वृक्षारोपणाचे आयोजन!

## सुधागड हायस्कूलमध्ये शालेय साहित्याचे वाटप
## आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कळंबोली शहराच्या वतीने मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता नवीन सुधागड हायस्कूल, कळंबोली येथे शालेय साहित्य वाटप, वृक्षदिंडी आणि वृक्षारोपण या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरप्रमुख तुकाराम सरक आणि नगरसेविका सायली सरक यांच्या पुढाकारातून हा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येणार आहे.आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, बॅनर आणि जाहिरातबाजी टाळून सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचे आवाहन कार्यकर्ते, समर्थक तसेच विविध सामाजिक संस्थांना केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत शिवसेना कळंबोली शहराचे शहरप्रमुख तुकाराम सरक आणि नगरसेविका सायली सरक यांच्या वतीने कळंबोली येथे वृक्षदिंडी, वृक्षारोपण आणि शालेय साहित्य वाटप या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याची भावना जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ करण्याचा आयोजकांचा मानस आहे.यासोबतच पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षदिंडी काढण्यात येणार असून त्यानंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम होणार आहे. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि झपाट्याने कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता "प्रत्येकाने किमान एक झाड लावावे आणि त्याचे संगोपन करावे" हा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही भावना समाजात रुजविण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात येणार आहे.शिक्षण आणि पर्यावरण या दोन्ही विषयांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरणार आहे. खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.वाढदिवसानिमित्त फुलांचे गुच्छ, हार-तुरे किंवा जाहिरातबाजी करण्यापेक्षा समाजाला प्रत्यक्ष लाभ होईल असे उपक्रम राबवावेत, ही आमदार प्रशांत ठाकूर यांची भूमिका असून त्याच विचारातून हा उपक्रम साकारण्यात आला आहे. त्यामुळे वाढदिवसाचे औचित्य साधून समाजसेवा, शिक्षणाला प्रोत्साहन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम कळंबोली परिसरासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

# लोकविकास सामाजिक प्रतिष्ठानचा आदिवासी वाड्यात रेनकोट वाटपाचा अभिनव उपक्रम!

## कोप्रोलीतील आदिवासी बांधवांना मदतीचा हात; शिक्षण व समाजप्रबोधनाचा संदेश!

**सा. युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : लोकविकास सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्या वतीने उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील आदिवासी वाड्यात रविवारी रेनकोट वाटपाचा अभिनव सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आदिवासी बांधवांना मदतीचा हात देत संस्थेने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला.

या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा. अर्जुनराव गवळी, उपाध्यक्ष मा. महेंद्रजी माघाडे, सचिव मा. नंदकुमार अहिरे, खजिनदार मा. गणेश कदम, मा. महेशजी साळवी, मा. सुनिलजी जोशी, मा. माधवराव भंडारी, मा. चंद्रकांतदादा साळुंखे, मा. सुनिता साळुंखे आणि मा. स्मिता माघाडे यांच्या हस्ते आदिवासी बांधवांना रेनकोटचे वाटप करण्यात आले.

हे रेनकोट मा. रमेश महंतो यांनी आपल्या दिवंगत मुलीच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपलब्ध करून दिले. कामाच्या



व्यस्ततेमुळे ते कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिलभाऊ जोशी यांनी केले. त्यांनी कोप्रोली परिसरातील आदिवासी समाजाच्या पाणीप्रश्नावर झालेल्या कामाचा आढावा घेत लोकविकास सामाजिक प्रतिष्ठानच्या स्थापनेमागील उद्दिष्टे व समाजहिताचे विविध उपक्रम उपस्थितांसमोर मांडले.

यावेळी चंद्रकांतदादा साळुंखे यांनी बी.पी.टी.मधून निवृत्तीनंतर समाजासाठी काहीतरी करण्याच्या भावनेतून संस्थेशी जोडले गेल्याचे सांगत संस्थेला एक लाख रुपयांची मदत दिल्याची माहिती दिली. महेश साळवी यांनी विविध उदाहरणांद्वारे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर महेंद्र माघाडे यांनी आदिवासी समाजासाठीचे हे आपले पहिले समाजकार्य असल्याचे सांगून भविष्यातही अशा उपक्रमांत सक्रिय राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

नंदकुमार अहिरे यांनी सुनिल जोशी यांच्या माध्यमातून आदिवासी समाजापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

अध्यक्ष अर्जुनराव गवळी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात लोकविकास सामाजिक प्रतिष्ठानची स्थापना सन २०१७ मध्ये चंद्रशेखर भावसार यांनी केल्याची माहिती दिली. संस्थेने अमरावती, पालघर, डहाणू आदी भागांमध्ये आदिवासी व इतर गरजूंसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आदिवासी समाजाने शिक्षणाला प्राधान्य देऊन इंग्रजीचे ज्ञान आत्मसात करावे, मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे आणि शासकीय तसेच इतर क्षेत्रांत रोजगाराच्या संधी मिळवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला कोप्रोली गावातील आदिवासी वाड्यातील महिला, पुरुष व लहान मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित नागरिकांनी लोकविकास सामाजिक प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे तसेच सर्व पदाधिकाऱ्यांच्या योगदानाचे मनःपूर्वक कौतुक करून कृतज्ञता व्यक्त केली.

# रॉबिन हूड शामा दादा कोलाम यांच्या समाधीस्थळी पर्यटन केंद्र उभारावे – मधुसूदन कोवे गुरुजी

## १ ऑगस्ट रोजी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन; आदिवासी समाजाच्या शिक्षण व विकासासाठी शासनाने विशेष पुढाकार घ्यावा, अशी मागणी

**सा. युवक आधार नागपूर**

**ज्योत्सना करवाडे** : आदिम समाजातील लोकनायक म्हणून ओळखले जाणारे रॉबिन हूड शामा दादा कोलाम यांच्या समाधीस्थळी राज्य शासनाने पर्यटन केंद्र विकसित करून या ऐतिहासिक स्थळाला योग्य न्याय द्यावा, अशी ठाम मागणी ग्राम स्वराज्य महामंचाचे अध्यक्ष मधुसूदन कोवे गुरुजी यांनी केली.

१ ऑगस्ट रोजी रॉबिन हूड शामा दादा कोलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित पुण्यस्मरण कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला शैलेश गाडेकर (राष्ट्रीय अध्यक्ष, शामा दादा ब्रिगेड), कृष्णा भिवनकर तसेच राजेंद्र आंबेकर (पोलीस पाटील) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी मधुसूदन कोवे गुरुजी यांनी आपल्या मार्गदर्शनात शासनाचे लक्ष वेधत सांगितले की, शामा दादा कोलाम यांचे कार्य व त्यांचा सामाजिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या समाधीस्थळाचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करणे आवश्यक आहे. त्यामुळे इतिहासाचे जतन होईल, स्थानिक रोजगाराला चालना मिळेल आणि आदिवासी समाजाच्या गौरवशाली परंपरेची ओळख राज्यभर पोहोचेल.

याशिवाय ग्रामीण व दुर्गम भागातील



आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी शासनाने विशेष योजना राबवाव्यात, शैक्षणिक सुविधा वाढवाव्यात आणि समाजाच्या विकासाकडे दुर्लक्ष न करता सर्वसमावेशक धोरण स्वीकारावे, असेही त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात समाजबांधवांनी शामा दादा कोलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या कार्याचा गौरव करत सामाजिक एकता आणि आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमात वसंत चिचकार, शामराव टेकाम (खैरी), संभाजी लोणसावळे, आनंदराव पिंपळे (पोफळणी), रामचंद्र राडेकर, रघुनाथ गुजराते, तुकाराम लोणसावळे, रंगराव येलकर, रामा टेकाम, खुशाल लोणसावळे, लालाजी वाटळकर, विनोद लोणसावळे, गुरुदेव कासार, सुनील पाडसिंगे, सुखदेव देवतळे, अविनाश मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शेवटी आयोजक वसंत चिचकार यांनी उपस्थित मान्यवर, समाजबांधव व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# दिग्दर्शक विजू माने यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलकरांना मोफत 'सिनेमा' भेट!

## मैत्री दिनाचे औचित्य साधून राकेश जाधव यांच्याकडून 'मामाच्या गोव्याला जाऊया'च्या फ्री शोचे आयोजन; कलाकारांच्या हजेरीने ओरियन मॉल गजबजला

**सा. युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी** : मराठी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय दिग्दर्शक विजू माने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि 'फ्रेंडशिप डे'च्या शुभमुहूर्तावर पनवेलकरांना एक अनोखी मनोरंजक भेट मिळाली. प्रसिद्ध समाजसेवक राकेश जाधव यांच्या वतीने ३१ जुलै रोजी प्रदर्शित झालेल्या 'मामाच्या गोव्याला जाऊया' या बहुचर्चित मराठी चित्रपटाच्या मोफत (फ्री) शोचे खास आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला पनवेलकर चित्रपट प्रेमींनी अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.रविवार, २ ऑगस्ट रोजी पनवेल येथील 'ओरियन मॉल'मधील चित्रपटगृहात हा विशेष शो पार पडला.शोची वेळ होण्यापूर्वीच सिने रसिकांनी मॉलमध्ये मोठी गर्दी केली होती. अनेक कुटुंबांनी एकत्र येत या विनामूल्य चित्रपटाचा आनंद लुटला आणि आयोजकांचे मनःपूर्वक कौतुक केले.

चित्रपट संपल्यानंतर प्रेक्षकांना एक मोठा सुखद धक्का मिळाला. चित्रपटाचे दिग्दर्शक विजू माने यांच्यासह मराठीतील स्टार कलाकार अंकुश चौधरी, कुशल बद्रिके, संतोष जुवेकर आणि अभिजित चव्हाण (बाबा) यांनी थेट सिनेमा हॉलमध्ये उपस्थित राहून प्रेक्षकांशी मनमोकळा संवाद साधला. आपल्या



लाडक्या कलाकारांना प्रत्यक्ष समोर पाहून चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. प्रेक्षकांनी कलाकारांसोबत फोटो, सेल्फी आणि ऑटोग्राफ घेण्यासाठी एकच गर्दी केली होती.

दिग्दर्शक विजू माने यांनी पनवेलकरांनी दिलेल्या या वाढदिवसाच्या अनोख्या भेटवस्तूबद्दल आणि प्रेमाबद्दल मनःपूर्वक आभार मानले.

"मराठी सिनेमाला प्रेक्षकांकडून मिळणारा हा पाठिंबा आणि प्रतिसाद संपूर्ण चित्रपटसृष्टीला ऊर्जा देणारा आहे," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. यामध्ये नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक तुषार पाटील तसेच केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी,शैलेश पाटणे यांनी उपस्थित राहून दिग्दर्शक विजू माने यांना वाढदिवसाच्या आणि संपूर्ण टीमला चित्रपटाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या.

कलाकारांची उपस्थिती, कौटुंबिक वातावरणात रंगलेला शो आणि वाढदिवसाचा उत्साह यामुळे रविवारी ओरियन मॉलमध्ये एक वेगळाच सणाचा माहौल निर्माण झाला होता. राकेश जाधव यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे संपूर्ण पनवेल परिसरातून जोरदार कौतुक होत आहे.

# भूमिपुत्र धर्माभिमानी संघटना आणि दक्ष नागरिक संघटनेचा दणका

## खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्तक्षेपानंतर शिळफाटा वाहतूक प्रश्नावर प्रशासनाची तातडीची हालचाल

**सा. युवक आधार**

**रमेश राऊत कल्याण / शिळफाटा(ठाणे):** कल्याण-शिळफाटा परिसरातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर अखेर प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. भूमिपुत्र धर्माभिमानी संघ आणि दक्ष नागरिक संघटना, शिळ-देसाई-दहिसर विभाग यांच्या पुढाकाराने काल दि.२ऑगस्ट रोजी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पीएंसोबत बैठक घेण्यात आली. त्यानंतर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे भूमिपुत्र धर्माभिमानी संघटनेचे ठाणे तालुकाध्यक्ष श्री.बाबुराव मुंडे यांच्यामार्फत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना कल्याण-शिळफाटा येथील वाहतूक कोंडीची सविस्तर माहिती देण्यात आली.

वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची गंभीर दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी संबंधित प्रशासनाला तातडीने उपाययोजना करून प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

या सूचनांनंतर आज वाहतूक विभागातील डीसीपी पंकज शिरसाट मुंब्रा वाहतूक विभागाचे अतुल अहिरे तसेच वाहतूक विभागातील बरेचसे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी





ठाणे महानगरपालिकेतील माजी उपमहापौर तसेच विद्यमान नगरसेवक रमाकांत मढवी स्थानिक नगरसेवक बाबाजी पाटील स्थानिक नगरसेविका वेदिका साहिल पाटील स्थानिक नगरसेविका अर्चना निलेश पाटील तसेच संबंधित प्रशासनातील सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे कल्याण-शिळफाटा परिसराला प्रत्यक्ष भेट देऊन वाहतूक कोंडीची पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक हिरा सिताराम पाटील,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कल्याण ग्रामिण विधानसभा सचिव शरद गुणाजी पाटील, दिवा शहर सचिव संतोष नारायण पाटील, शिवसेनेचे चंद्रकांत गणू अलीमकर निलेश पाटील, गणेश आलो मुंडे, वैभव आलिमकर,बाबुराव चांगा पाटील. भूमिपुत्र धर्माभिमानी संघटनेचे अध्यक्ष महेंद्र पाटील ठाणे तालुका अध्यक्ष बाबुराव मुंडे,रवींद्र गणेश पाटील, प्रवीण शांताराम पावशे, ज्ञानेश्वर बाळाराम पाटील, जितेश लक्ष्मण पाटील आणि दक्ष नागरिक संघटनेचे वैशाली भोसले,भारतीय जनता पार्टीचे साहिल बाळाराम पाटील,पत्रकार विनोद वास्कर, पत्रकार रमेश राऊत तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या सूचना जाणून घेण्यात आल्या.

शिळफाटा परिसरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी संघटनांनी यावेळी पुन्हा एकदा केली. प्रशासनाच्या या हालचालीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये वाहतूक प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

तसेच दैनिक युवक आधारचे पत्रकार रमेश राऊत यांनी सुद्धा शिळफाटा ट्राफिक संबंधात वारंवार प्रश्न उपस्थित करून आणि येथे होणाऱ्या अवैद्य वाहन तपासणी बद्दल बातम्या प्रसारित केल्या होत्या

त्याचप्रमाणे कल्याण फाटा सर्कललाच लागून असलेल्या अभय नगर येथील रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला आहे त्यामुळे अभय नगरवासीयांनारस्ता ओलांडताना भरपूर असा त्रास सहन करावा लागत आहे आणि आत्ता विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांवर कारवाई करताना अभय नगर मधील रहिवाशांना या कारवाईचा सामना करावा लागत आहे त्याबद्दल दैनिक युवक आधारचे पत्रकार रमेश राऊत यांनी वाहतूक विभागातील अधिकाऱ्यांना प्रश्न विचारला असता माजी उप महापौर रमाकांत मढवी साहेब यांनी अभय नगर वाल्यांना एक विशिष्ट प्रकारचा ओळखपत्र तयार करून देण्याची शिफारस वाहतूक विभागाकडे केली आहे जेणेकरून अभय नगर मधील नागरिकांना होणाऱ्या कारवाईचा त्रास होणार नाही.

# ट्रेकिंगसाठी डोंगरावर गेलेले तरुण अडकले, पोलिसांनी सहा जणांना सुखरूप आणले खाली



**सा. युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल, नवी मुंबईतील सहा जण रानसई खैरकुटी (उरण) येथून ट्रेकिंगसाठी गेले होते. ते कल्हे गाव येथील डोंगरावर गेल्यानंतर अंधार पडल्याने त्यांना बाहेर जायचे समजले नाही. त्यांनी पोलिसांना फोन केल्यानंतर पनवेल तालुका पोलिसांच्या मदतीने सहा जणांना सुखरूपपणे खाली आणण्यात आले.

आयुष संदीप गुप्ता (कळंबोली), वेदांत किरण दिवेकर (खांदा कॉलनी), वेदांत नितीन नाईक (रोडपाली), आदित्य जयराम राय (खारघर), प्रसनजीत कुंदन कांबळे (सीवूड), निखिल जयस्वार (रोडपाली) त्या सहा जणांनी दोन ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता रानसई येथून ट्रेकिंगला सुरुवात केली. दुपारी ते कल्हेगाव, पनवेल येथील डोंगरावर आल्यानंतर संध्याकाळी अंधार पडला. यावेळी त्यांना बाहेर कसे पडायचे याबाबत समजले नाही. त्यांनी 112 ला फोन केला. त्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार बीट मार्शल पनवेल तालुका पोलीस हवालदार संजय दोरगे, पोलीस शिपाई तुकाराम भोये, पोलीस पाटील संतोष मोरे हे त्या ठिकाणी गेले. मात्र अंधार असल्याने काहीही दिसत नव्हते. मोबाईल आणि मॅपच्या साहाय्याने ते दीड तासाच्या प्रयत्नानंतर सहा जणांच्या जवळ पोहोचले आणि वाट चुकलेल्या सर्व सहा जणांना व्यवस्थित, सुखरूपपणे खाली आणण्यात आले आणि ते 6 जण त्यांच्या घरी गेले.

# जनतेच्या तक्रारींचा कालबद्ध निपटारा करा; दिरंगाई व भ्रष्टाचार खपवून घेणार नाही : आमदार अब्दुल सत्तार

**सा. युवक आधार**

**प्रतिनिधी विजय काळे** : सोयगावात लोकसंपर्क अभियानांतर्गत तक्रार निवारण व आढावा बैठक; अधिकाऱ्यांना आमदार अब्दुल सत्तार यांचे स्पष्ट निर्देश आ.अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून व अध्यक्षतेखाली सोयगाव येथील पंचायत समिती व तहसील कार्यालयात लोकसंपर्क अभियानांतर्गत नागरिकांच्या तक्रार निवारण व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची सुनावणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले. तहसील कार्यालयातील बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी फेरफार,वारस नोंद, नामांतरण,७/१२ दुरुस्ती, ई-पीक पाहणी, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती पंचनामे, महसूल न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण, गौण खनिजांची अवैध वाहतूक, जात, उत्पन्न व रहिवासी दाखल्यांसह सर्व महसूल विषयक प्रकरणांचा कालबद्ध निपटारा करण्याचे आदेश दिले.बैठकीत प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर वेळेत कार्यवाही करून अर्जदाराला त्याची माहिती देण्याचे निर्देशही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले.तसेच पाणंद रस्त्यांबाबतचे तिढे तातडीने सोडवून संबंधित कामांना सुरुवात करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले.पंचायत समिती कार्यालयातील बैठकीत घरकुल,विहीर, रोजगार हमी योजनेसह विविध शासकीय योजनांमध्ये लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी गंभीर असल्याचे सांगत अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही, असा इशारा आमदार अब्दुल सत्तार यांनी दिला. पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत लाभापासून वंचित ठेवू नये, नागरिकांच्या अर्जांचा निश्चित कालमर्यादेत निपटारा करावा, ग्रामपंचायत




स्तरावरील विकासकामांना गती द्यावी, तसेच पिण्याचे पाणी, रस्ते, स्वच्छता, घरकुल, शौचालय व रोजगार हमी यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**प्रलंबित देयकांसाठी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांची भेट घेणार**

बैठकीदरम्यान वैयक्तिक सिंचन विहीर, गाय गोठा तसेच शासनाच्या विविध योजनांतील कुशल व अकुशल कामांची प्रलंबित देयके याबाबत अनेक नागरिकांनी आमदार अब्दुल सत्तार यांच्याकडे तक्रारी मांडल्या. याची गंभीर दखल घेत संबंधित मंत्री भरत गोगावले यांची भेट घेऊन हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करू, अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.

तसेच अनेक नागरिकांनी रेशनचा नियमित लाभ मिळत नसल्याची तक्रार मांडली. याची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना नियमित रेशनचा लाभ मिळेल, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सिल्लोड-सोयगाव तालुक्यासाठी वाढीव रेशन इष्टांक मंजूर व्हावा यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू असून हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी ग्वाहीही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रत्येक तक्रारदाराशी वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाठपुरावा करण्याच्या सूचना देत नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी आमदार अब्दुल सत्तार म्हणाले, "जनतेची कामे हीच आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचल्या पाहिजेत. नागरिकांना न्याय, सन्मान आणि वेळेत सेवा मिळाली पाहिजे. कामात दिरंगाई, हलगर्जीपणा किंवा भ्रष्टाचार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही.

प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने काम करून जनतेचा विश्वास जपावा."बैठकीस तहसीलदार मनीषा मेने,गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड,सहाय्यक गटविकास अधिकारी अमोल जगताप, नायब तहसीलदार तथा नगरपंचायतीचे प्रभारी मुख्याधिकारी संभाजी देशमुख, बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता राजेश राजगुरू, सिंचन विभागाच्या उपविभागीय अधिकारी रुचिका घोगरे, तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे टाकसाळ,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.जितेश जावळे,महिला व बाल विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी सुभद्रा सैवर, गटशिक्षणाधिकारी अक्षय धांदर,शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंह चव्हाण,सिल्लोड तालुकाप्रमुख केशवराव तायडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दारासिंग चव्हाण,फर्दापूर येथील बंडू काळे,शिवप्पा चोपडे,गणेश भाऊ खैरे,सोपान गावंडे,युवासेना पदाधिकारी कुणाल राजपूत, नगरपंचायतीतील शिवसेना गटनेते अक्षय काळे,नगरसेवक राजू दुतोंडे,स्वप्निल पाटील,शहरप्रमुख संतोष बोडखे,हर्षल काळे,कादिर शहा,सलीम पठाण,किशोर मापारी,गजानन कुंडले,आदी उपस्थित होते.

## टेंभुर्णीत मातंग समाज बांधवांच्या वतीने लोकशाहीर, साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

**सा. युवक आधार**

**जाफराबाद/ टेंभुर्णी प्रतिनिधी** : टेंभुर्णी येथे मातंग समाज बांधवांच्या वतीने लोकशाहीर, साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व क्रांतिकारी कार्याचा गौरव करत अण्णाभाऊंच्या विचारांचा समाजाने अंगीकार करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिताराम गोफणे होते. उपाध्यक्ष ज्ञानदेव गोफणे, तर सचिव शिवाजी ससाने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन शालिकराव म्हस्के साहेब यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संजू बाबा गायकवाड, बंडू डोईफोडे, भारती गोफणे (सरपंच, भातोडी), अनिल ससाने (उपसरपंच, पापळ), ज्योतीबा कांबळे, गौतम म्हस्के, गणेश धनवई, फैसल चाऊस आणि बाळू देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती

कार्यक्रमास टेंभुर्णी येथील मातंग समाजबांधव किशोर कांबळे, संजय गोफणे, राजू गोफणे, लखन साबळे, अजय गोफणे, हरिदास गोफणे, गणेश साहेबराव गोफणे, अंकुश गोफणे, काशीनाथ गोफणे, भास्कर गोफणे, विजय सर्जेराव गोफणे,



सचिन गोफणे, अरुण गोफणे, सिद्धांत गोफणे, मंगेश गोफणे, रवि गोफणे, वसंता गोफणे, दुर्गादास गोफणे, रुद्र कांबळे, सुरेश गोफणे, विकास गोफणे, तुळसीदास गोफणे, काळूराम गोफणे, शांताराम गोफणे, विष्णु गोफणे, प्रदीप कांबळे, अजू गोफणे, रामेश्वर साबळे, पूंजाराम गोफणे, संदीप सगट, बालाजी लोखंडे, किशोर गोफणे, गजानन शेनफड गोफणे, आकाश गोफणे यांच्यासह महिला भगिनी, युवा वर्ग तसेच पंचक्रोशीतील तमाम मातंग समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.जयघोष, सांस्कृतिक वातावरण आणि उत्साहपूर्ण सहभागामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजू गोफणे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मधुकर गोफणे सर यांनी केले. उपस्थितांचे आभार मानून जयंती सोहळ्याची उत्साहात सांगता करण्यात आला

## खारघरच्या पाणीटंचाईवरून सिडकोला नागरिकांचा घेराव; तीन तास आंदोलन, दोन तास चर्चेनंतर १५ दिवसांत उपाययोजनांचे लेखी आश्वासन

**साप्ताहिक युवक आधार**

**पनवेल : प्रतिनिधी** : राज्यभर मुसळधार पाऊस सुरू असतानाही खारघर परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी भाजपच्या नगरसेविका उषा अडसुळे आणि समीर कदम यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी सिडकोच्या रायगड भवन कार्यालयावर धडक मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले. जवळपास तीन तास सुरू असलेल्या या आंदोलनामुळे सिडको कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलनादरम्यान नागरिकांनी सिडको प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी करत अधिकाऱ्यांना विविध प्रश्नांवर जाब विचारला. आंदोलनकर्त्यांनी खारघरमध्ये नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्यभर पावसाने जोर धरला असतानाही खारघरकरांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे सांगत सिडकोच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. विशेष म्हणजे,



पाणीटंचाईमागे टँकर लॉबीला जास्त प्राधान्य दिले जात असल्याचा गंभीर आरोपही नागरिकांनी केला. नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा करण्याऐवजी टँकर व्यवस्थेला चालना दिली जात असल्याने नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. यावेळी दर सोमवारी केली जाणारी पाणी कपातही आंदोलनाचा प्रमुख मुद्दा ठरला. आरटीआयमधून मिळालेल्या माहितीनुसार अशा प्रकारच्या नियमित पाणी कपातीची कोणतीही स्पष्ट तरतूद किंवा आदेश नसल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. मग ही पाणी कपात नेमकी कोणाच्या आदेशाने केली जाते, असा थेट सवाल सिडको अधिकाऱ्यांना करण्यात आला. याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन सिडको प्रशासनाने आंदोलनाच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावले. त्यानंतर सुमारे दोन तास सिडकोचे अधिकारी, नगरसेविका उषा अडसुळे, समीर कदम आणि नागरिकांच्या प्रतिनिधींमध्ये सविस्तर बैठक पार पडली. बैठकीत पाणीपुरवठ्याशी संबंधित विविध प्रश्न, नागरिकांच्या तक्रारी आणि उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर सिडको प्रशासनाने नागरिकांच्या मागण्यांची दखल घेत १० ते १५ दिवसांची मुदत मागितली. या कालावधीत वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन पाणीपुरवठा वाढविणे, उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि नागरिकांना अधिक प्रभावीपणे पाणीपुरवठा करण्याबाबत आवश्यक निर्णय घेण्यात येतील, असे लेखी आश्वासन सिडकोकडून देण्यात आले. संबंधित आश्वासनाचे पत्र आंदोलनकर्त्यांना सुपूर्द करण्यात आले. दरम्यान, पाणीटंचाईबाबत स्पष्टीकरण देताना सिडको अधिकाऱ्यांनी सांगितले की, यंदा जुलै महिन्यापासून पावसाला सुरुवात झाली असली तरी त्यापूर्वी धरणातील पाणीसाठा अवघ्या दहा टक्क्यांवर आला होता. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे नियोजन करून पुरवठा करावा लागला. आता धरणातील पाणीसाठा हळूहळू वाढत असून, पुढील काही दिवसांत परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा आहे. तसेच नागरिकांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सिडकोच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले, तरी दिलेल्या मुदतीत ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

## लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल; पोलिस प्रशासनाच्या दडपशाहीच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने, गुन्हे मागे घेण्याची मागणी :– डॉ.गणेश ढवळे

**सा. युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दौऱ्यादरम्यान न्यायाच्या मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना परवानगी नाकारण्यात आली. तसेच पालकमंत्र्यांची भेट घडवून आणण्याचे आश्वासन देण्यात आले असतानाही ऐनवेळी भेट न झाल्याने आंदोलनकर्त्यांनी "न्याय द्या" अशा घोषणा दिल्या. त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल करून अपमानास्पद वागणूक दिल्याच्या आल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. ३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'लोकशाही वाचवा', 'संविधान वाचवा', 'आंदोलन आमचा हक्क आहे', 'पोलिस प्रशासनाच्या दडपशाहीचा धिक्कार असो' अशा घोषणांनी निदर्शने करण्यात आली.

या नंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री सुनेत्रा पवार, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, संभाजीनगर परीक्षेत्र यांना निवेदन पाठविण्यात आले. आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे




पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच), नितीन सोनवणे ( राज्य प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड), प्रेम कांबळे( दलित पँथर युवा जिल्हाध्यक्ष बीड), राजेंद्र आमटे (शेतकरी हक्क आंदोलक), किष्किंधा पांचाळ (जिल्हाध्यक्ष, विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज, बीड), सिता दहे, सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक, बीड), सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, मिलिंद सरपते, भिमराव कुटे, अरूण पांचाळ, समाधान पांचाळ, प्राचार्य डी.जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), ज्येष्ठ समाजसेवक डॉ.संजय तांदळे, नितीन जायभाये (अध्यक्ष, बीड शहर बचाव मंच), सुर्यकांत ठोकळ, भिंगरेश जोगदंड, राजेश वाघमारे, आनंद डोंगरे, सुंदर वाघमारे, अविनाश वडमारे, शेख अख्तर, सादेक सौदागर, रफिक पठाण, आण्णा डांगे, बबिता शिंदे, सय्यद सादेक, दशरथ थोरात, शारदा थोरात, उमेश गुरू, विनोद कुटे, दिपक शिंदे, प्रविण आनेराव, जालिंदर जगताप,

आदी सहभागी झाले होते. डॉ.गणेश ढवळे यांनी सांगितले की, बीड जिल्हा रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान मृत्यू झालेल्या छाया गणेश पांचाळ यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी गेल्या वर्षभरापासून विविध आंदोलने व निवेदने देण्यात आली. मात्र न्याय न मिळाल्याने किष्किंधा पांचाळ यांनी पालकमंत्र्यांच्या ताफ्यासमोर "छाया पांचाळ यांना न्याय द्या" अशा घोषणा दिल्या.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी आंदोलनकर्त्यांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नेऊन अपमानास्पद वागणूक दिल्याचा तसेच बाळासाहेब मोरे पाटील यांना घोषणाबाजी केली नसतानाही मारहाण केल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली. डॉ.ढवळे यांनी पुढे सांगितले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १९(१)(ब) नुसार नागरिकांना शांततापूर्ण व विनाशस्त्र एकत्र येऊन आंदोलन करण्याचा मूलभूत अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयानेही शांततापूर्ण आंदोलन हा लोकशाहीचा अविभाज्य भाग असल्याचे विविध निर्णयांमध्ये स्पष्ट केले आहे. मात्र बीडमध्ये शांततापूर्ण आंदोलनांनाही परवानगी नाकारून आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जात असल्याने ही लोकशाहीविरोधी भूमिका असल्याचा आरोप त्यांनी केला.

## विद्यार्थ्यांसाठी सूक्ष्मजीवांच्या अद्‌भुत विश्वाची रोमांचक सफर

**सा. युवक आधार**

**इंदापूर : विकास क्षत्रिय** : विद्या प्रतिष्ठानच्या अनंतराव पवार इंग्लिश मिडियम स्कूल (सीबीएसई) येथे इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी"संवादात्मक व्याख्यान व सूक्ष्मदर्शक निरीक्षण सत्र"उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस,इंडिया (NASI)– पुणे शाखा नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्स (NCCS),पुणे आणि आगरकर संशोधन




संस्था (ARI),पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या सत्रात डॉ.शर्मिला बापट,डॉ.सुरेंद्र घासकडबी, कु. उत्कर्षा टिकोले आणि श्री.मदन पी.या शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना सूक्ष्मजीवांचे महत्त्व, सूक्ष्मदर्शकाचा वापर,वैज्ञानिक निरीक्षणाची पद्धत तसेच दैनंदिन जीवन,पर्यावरण आणि वैज्ञानिक संशोधनातील सूक्ष्मजीवांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी अत्याधुनिक सूक्ष्मदर्शकाच्या साहाय्याने हायड्रा व डायटॉम्सच्या स्लाईड्सचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. यावेळी सूक्ष्म शैवालांची वैशिष्ट्ये, त्यांच्या सिलिका पेशीभित्तीची रचना, ऑक्सिजन निर्मितीतील योगदान आणि जलपरिसंस्थेतील महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून माहिती मिळवली. प्रत्यक्ष निरीक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची जिज्ञासा,वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निरीक्षण कौशल्य अधिक विकसित झाले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारत सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या अनुभवातून विज्ञानातील संकल्पना अधिक स्पष्टपणे समजल्या असून संशोधन क्षेत्राविषयीची आवडही वाढल्याचे दिसून आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा जाधव यांनी केले,तर आभार प्रदर्शन राधिका प्राक्टूर यांनी केले. शाळेच्या प्राचार्या डॉ.सरिता शिंदे तसेच विज्ञान विभागातील सर्व शिक्षिकांच्या सहकार्याने हा नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नगराजशेठ सीबीएस ईइंटरनॅशनल स्कूल मध्ये नशामुक्त अभियान संपन्न
## अभ्यासाव्यतिरिक्त नशा करू लागलो तर आपली गती मंदावते : जगदीश शेलकर

**सा. युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यानी देशभरातव्यसन मुक्ती अभियान सुरु केले याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेद्र फडणवीस यांनी राज्यात नशा मुक्त अभियानाचा शुभारंभ केला आहे, हाच धागा पकडून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने संपूर्ण नवीमुंबई परिसरात हे अभियान मोठया उत्साहात सुरु आहे.

उरण तालुकाही या बाबतीत एक पाउल पुढे असून उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जगदीश शेलकर साहेबांनी संपूर्ण उरण नशा मुक्त करण्या साठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे व उपपोलीस आयुक्त रश्मी नांदेडकर. यांच्या मार्गदर्शनाखाली व बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या सौजन्याने उरण मधील शालेय विद्यार्थांमध्ये हि जागृती करण्या साठी नशा मुक्त अभियान सुरु केले असून त्याचा एक भाग म्हणून उरण मधील नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल मध्ये हे अभियान नगराजशेठ सीबीएस ईइंटरनॅशनल स्कूल व नागरी संरक्षण दल उरण-रायगड यांच्या संयुक्तविद्यमाने व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने राबविण्यात आले होते.यावेळी उपस्थित विद्यार्थांना संबोधितकरण्या साठी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जगदीश शेलकर साहेबउपस्थित होते यावेळी विद्यालयाच्या प्रिन्सिपॉल ज्योती मॅडमव प्रशासीय अधिकारी प्रदीप पाटील सर यांनी त्यांचे स्वागत केले.



औपचारिक स्वगता नंतरविद्यार्थ्यांना संबोधित करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जगदीश शेलकर साहे म्हणाले सर्व प्रथममीसर्वांचे स्वागत करतो आपण सारे विद्यार्थी आहात तेव्हां अभ्यासाकडे तुम्ही लक्ष केंद्रित करा स्वताचा विकास सादावयाचा असल्यास आपल्या अभ्यासाची प्रगती साधणे आवश्यक आहे प्रगती साधावयाची असेल तर प्रगतीला शिस्त आणि गतिची जोड द्यावी लागते या स्कूलमध्ये समोर भव्य भितीवरील चित्र हे सारे सागून जाते निसर्ग आपले काम चोख बजावीत असतो येथे सूर्याच्याभोवती सूर्य मंडळत फिरणाऱ्या ग्रहांची चित्रे आहेत त्या पैकी आपण सारे पृथ्वीवर राहतो पण आपली पृथ्वी एका ठराविक कालमर्यादेत सूर्याच्या भोवती फिरत आहे, तच्या कालमर्यादेचा वे आजही कायम आहे हे चक्र जर बदले तर आपण या पृथीवर जिवंत राहू शकणार नाही तेव्हां निसर्गाकडून बरेच काही शिकण्या सारखे असते.

असे सांगून श्री. शेलकर साहेब पुढे म्हणाले तुमची प्रगती करायची असेल तर आपली गती योग्य असावी लागते पण आपण व्यसनाधीन झालो अभ्यासाव्यतिरिक्त नशा करू लागलो तर आपली गती मंदावते नशेचे व्यसन कुणी बाहेरून येऊन आपल्याला लावत नाही तर आपल्या जवळील मित्र, माणसे अपल्याला नशेचे व्यसन लावतात त्यांच्या पासून आपण सावधान राहिले पाहिजे आपल्या मित्रांना नशेच्या व्यसनमुक्त करायला पाहिजे आपल्या घरात वडील दारू पीत असतील तर त्यना त्यापासून मुक्त करयला हवे. कारण अमली पदार्थ,नशा आणणारे पदार्थ,ड्रग सिगारेट.तंबाखू अफू गांजा,दारू सारख्या नशा आणणाऱ्या पदार्थान पासून आपण दूर राहिले पाहिजे, आपल्या परिवाराला.शेजारी,मित्रयां आपण नशे पासून दूर राहण्या साठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.रस्त्यावर अपघाताचे प्रमाणही वाढले आहे आपल्या बाबांना हेल्मेट घालण्याची सक्ती तुम्ही करायला हवी सावधगिरीने स्वताचा प्रवास करावा वेगवेगळ्या नशेली पदार्थापासून सावध असावे.

त्याच प्रमाणे मोबाईलचा वापर कमी करावा.अलीकडे सायबरगुन्हेगार जाळे टाकून बसले आहेत तेव्हां माहिती नसलेला नंबरवर संपर्क करू नका. आपल्या सेवेत महाराष्ट्र पोलीस व नवी मुंबई पोलीस सदैव तत्पर आहेत. यासाठी संकटकाळी तत्काळमदतीसाठी(112)हा एकाच नंबरआपण डायल करायचा आहे.मग तो पोलीस मदतीसाठी असो वैद्यकीय मदत,अग्निशमन सेवा,महिला सुरक्षा किंवा अपघातातील मदत असो आपल्या साठी पोलीस तत्पर आहेत.

आजड्रग्ज नको शिक्षण हवे, ड्रग्ज घेण्य पेक्षा जीवन महत्वाचे आहे,कारण अमली पदार्थ,नशा आणणारे पदार्थ,ड्रग सिगारेट.तंबाखू अफू गांजा सारख्या नशा आणणाऱ्या पदार्थानपासून आपण दूर राहणेव आपल्या कुटुंबांतील सदस्य असो व आपले मित्र असो त्यान या नशे पासून दूर ठवले पाहिजे ही काळाची काळाची गरज आहे, असे त्यांनी शेवटी सांगितले या कार्यक्रमाचे सूत्र संचलन अंकिता मॅडम यांनी केले.

---

# अमरधाम स्मशानभूमीच्या प्रश्नावर पनवेल महापालिकेत शिवसेनेचा आक्रमक पवित्रा; स्थलांतराच्या चर्चेला कडाडून विरोध

**सा. युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** अमरधाम स्मशानभूमीतील नादुरुस्त शवदाहिनीमुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीचा मुद्दा पनवेल महापालिकेच्या महासभेत पुन्हा एकदा गाजला. या विषयावर शिवसेनेचे नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी आक्रमक भूमिका घेत स्मशानभूमीचे स्थलांतर किंवा बंद करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला तीव्र विरोध दर्शविला.



यावेळी नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी सांगितले कि, अमरधाम स्मशानभूमी हा मूळ पनवेलकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असून, गेल्या वर्षी ऑगस्ट-सप्टेंबरपासून स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण यांनी या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर नगरसेवकांनीही महापालिकेकडे वारंवार पाठपुरावा करून शवदाहिनीच्या दुरुस्तीची आणि नवीन यंत्रणा बसविण्याची मागणी केली. महापौर नितीन पाटील यांनीही या प्रश्नाची गंभीर दखल घेत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह अमरधाम स्मशानभूमीची पाहणी केली होती. त्यानंतर जुन्या शवदाहिनीचा वापर बंद करून नवीन अत्याधुनिक शवदाहिनी बसविण्याचा प्रस्ताव महासभेत चर्चेसाठी मांडण्यात आला.

महासभेत बोलताना शिवसेनेच्या नगरसेवकांनी विषयपत्रिकेच्या गोषवाऱ्यात शिवसेनेच्या मूळ पाठपुराव्याचा आणि संबंधित पत्रव्यवहाराचा उल्लेख न केल्याबद्दल त्यांनी आक्षेप नोंदविला.

श्रेयाचा मुद्दा नसून, शिवसेनेने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची अधिकृत नोंद महापालिकेच्या अभिलेखात असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी अमरधाम स्मशानभूमी स्थलांतरित किंवा बंद करण्याबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही शिवसेनेने कठोर भूमिका मांडली. कोणतेही नैसर्गिक किंवा तांत्रिक कारण पुढे करून स्मशानभूमीचे स्थलांतर करण्याचा प्रयत्न झाल्यास शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही सोमण यांनी दिला आहे. अमरधाम स्मशानभूमीच्या आधुनिकीकरणासह नागरिकांना सन्मानपूर्वक आणि अखंड सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेनेने यावेळी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

---

# महागांव येथे लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी

**सा. युवक आधार**

**एम डी सुरोशे महागांव : यवतमाळ** : दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी लोकशाहीर, साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त महागांव शहरात त्यांच्या तेलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे उत्सव समिती, महागांव यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, लोककला



आणि समाजप्रबोधन क्षेत्रातील अमूल्य योगदानाचे स्मरण केले. वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे वक्त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. त्यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक समता, बंधुता आणि एकात्मतेचा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमास नगरपंचायत उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे, नगरसेविका जयश्री नरवाडे, माजी नगरसेवक राजू राठोड, लक्ष्मी रणखांब, वर्षा गायकवाड, विनायक गायकवाड, साहेबराव रणखांब, विशाल रणखांब, अनिकेत हुपाडे, नारायण सुरोशे, मनोज सुरोशे, राजू रणबावळे, संतोष वाहुळे, गणेश वाहुळे, सुभाष पतंगे, गजानन सुरोशे, गोपाळ रणखांब, अशोक गवळी, गजानन गुणाजी सुरोशे, गजानन कैलास सुरोशे तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे उत्सव समिती, महागांव यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समता आणि बंधुभावाची चळवळ अधिक बळकट करण्याचा संकल्प केला.

---

# जनावरे पाणी पाजताना पाटात पडून १२ वीच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू

**सा.युवक आधार**

**नाशिक राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील शिवडी येथील १७ वर्षीय तरुणाचा पालखेड कालव्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २) सायंकाळी घडली. ओम नवनाथ जाधव (वय १७) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून तो इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत होता. एकुलत्या एक मुलाच्या आकस्मिक निधनाने शिवडी परिसरात शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ओम हा रविवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पालखेड कॅनॉल परिसरात जनावरे पाणी पाजण्यासाठी गेला होता. यावेळी त्याचा अचानक तोल गेल्याने तो कालव्याच्या पाण्यात पडला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर चांदोरी येथील आपत्ती व्यवस्थापन समितीचे सागर गडाख व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली.मात्र, अंधार पडल्यामुळे रविवारी रात्री शोधकार्य थांबविण्यात आले. सोमवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. अखेर दुपारी सुमारे पावणेतीन वाजता पालखेड डावा कालवा, चारी क्रमांक १४ जवळ ओमचा मृतदेह आढळून आला.ओम हा बारावीचा विद्यार्थी असून अभ्यासाबरोबरच कुटुंबाला शेतीच्या कामात मदत करत होता. त्याच्या पश्चात आई, वडील, बहीण, चुलते व चुलती असा परिवार आहे. एकुलत्या एक मुलाच्या निधनामुळे जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावासह परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.या प्रकरणाची नोंद निफाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

---

# निर्भीड पत्रकारितेचा राज्यस्तरीय गौरव; प्रताप नागरे यांना 'महाराष्ट्रातील उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार २०२५-२६'

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम दैनिक चालू वार्ताच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय गौरव सोहळ्यात वाशिमचे पत्रकार तथा समाजसेवक प्रताप नागरे यांना 'महाराष्ट्रातील उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार २०२५-२६' प्रदान करून त्यांच्या निर्भीड, निष्पक्ष आणि जनहितवादी पत्रकारितेचा राज्यस्तरावर गौरव करण्यात आला.

हा पुरस्कार उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांचे ओएसडी तथा महाराष्ट्र वैद्यकीय साहित्य कक्ष प्रमुख मा. मंगेशजी चिवटे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व प्रशस्तीपत्र प्रदान करून देण्यात आला. यावेळी राज्यभरातील संपादक, पत्रकार, प्रतिनिधी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच दैनिक चालू वार्ता महाराष्ट्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.




प्रताप नागरे यांनी वाशिम जिल्ह्यातील जनतेच्या समस्या, शासकीय कामकाजातील त्रुटी, सामाजिक प्रश्न, ग्रामीण भागातील विकासकामे तसेच लोकहिताच्या विविध विषयांवर सातत्याने प्रभावी व निर्भीड पत्रकारिता करत जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. पत्रकारितेसोबतच समाजसेवेतील सक्रिय योगदान आणि लोकाभिमुख कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार बहाल करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रताप नागरे यांनी हा सन्मान जनतेच्या विश्वासाचा आणि पत्रकारितेच्या मूल्यांचा असल्याचे सांगत, भविष्यातही सत्य, निष्पक्षता

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुण्यात सन्मान; पत्रकारिता व समाजकार्यातील योगदानाची दखल**

वाशिमचे पत्रकार प्रताप नागरे यांचा राज्यस्तरीय सन्मान
'महाराष्ट्रातील उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार २०२५-२६' प्रदान
मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुण्यात गौरव
पत्रकारिता आणि समाजकार्यातील उल्लेखनीय योगदानाची दखल
दैनिक चालू वार्ताच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळा

आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देत अधिक जबाबदारीने पत्रकारिता करण्याचा निर्धार व्यक्त केला.

---

# सेलू येथे सामूहिक नामजप सोहळा भक्तिभावात संपन्न

**सा युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : सेलू शहरातील ब्राह्मण गल्ली येथील श्री दत्त मंदिरात रविवारी (दि. २ ऑगस्ट) सायंकाळी ४ ते ५ या वेळेत 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या पवित्र महामंत्राचा सामूहिक नामजप सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात व उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यास शहरासह परिसरातील अनेक दत्तभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नामस्मरणाचा लाभ घेतला.



श्रीमंत परमपूज्य सद्गुरू योगानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त श्री योगानंद सरस्वती संस्थान, गुंजचे परमपूज्य राजेशभाई देसाई महाराज यांच्या संकल्पनेतून 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या दिव्य महामंत्राचा १०० कोटी नामजप करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सेलू येथे या सामूहिक नामजप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री दत्तमूर्तीच्या पूजनाने व दत्तत्रिपदीने झाली. त्यानंतर उपस्थित भाविकांनी एकचित्ताने 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा अखंड जप करून संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून टाकला. नामस्मरणामुळे वातावरणात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली असून, उपस्थित भाविकांनी शांतता, समाधान आणि आत्मिक आनंदाची अनुभूती व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक मंडळ, स्वयंसेवक तसेच उपस्थित दत्तभक्तांनी मोलाचे सहकार्य केले.

---

# एका बाजूला चालकांची जीवघेणी कसरत; दुसऱ्या बाजूला गळकी एसटी — प्रवाशांचे हाल कोण पाहणार?

**सा. युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन तालुक्यात एसटी चालकांना अक्षरशः जीव धोक्यात घालून बस चालवावी लागत आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी एसटी रस्त्याच्या कडेला घसरल्याच्या घटना यापूर्वी घडल्या असून, खराब रस्ते, पावसाचे पाणी आणि घसरडी परिस्थिती यामुळे चालकांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. मात्र या गंभीर परिस्थितीत एसटी महामंडळाचा गलथान कारभारही पुन्हा एकदा समोर आला आहे.




लांब पल्ल्याच्या आणि चांगला व्यवसाय करून देणाऱ्या मार्गांवरील अनेक बस निकृष्ट दर्जाच्या असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून वारंवार केल्या जात आहेत. प्रवासादरम्यान बस रस्त्यात बंद पडणे, टायर निघून जाणे, यांत्रिक बिघाड होणे अशा घटना नवीन राहिलेल्या नाहीत. आता तर पावसाळ्यात बसच्या आतील भागातच पावसाचे पाणी गळत असल्याने प्रवाशांचे हाल अधिकच वाढले आहेत.काल श्रीवर्धन–नालासोपारा या मार्गावरील बसमध्ये प्रवास करत असताना मध्येच जोरदार पाऊस सुरू झाला. त्यावेळी बसच्या छतामधून आणि विविध भागांतून पाणी गळू लागल्याने प्रवाशांची अक्षरशः तारांबळ उडाली. काही प्रवाशांनी सीट बदलण्याचा प्रयत्न केला, तर काहींना उभे राहून प्रवास करावा लागला. "तिकीट काढून पैसे देऊन प्रवास करायचा आणि वर असा नाहक त्रास सहन करायचा, ही कोणती सेवा?" असा संतप्त सवाल प्रवाशांनी उपस्थित केला.

प्रवाशांच्या मते, एसटी महामंडळाची ही अवस्था काही नवीन नाही. दरवर्षी पावसाळ्यात गळक्या बस, अपुरी देखभाल आणि प्रवाशांच्या गैरसोयीचा प्रश्न कायम राहतो. एका बाजूला चालक प्रतिकूल परिस्थितीत सेवा देत आहेत, तर दुसऱ्या बाजूला बसची दुरवस्था प्रवाशांच्या सुरक्षेलाच धोका निर्माण करत आहे.पावसाळा सुरू असताना तरी श्रीवर्धन आगारासह संबंधित अधिकाऱ्यांनी बसची तातडीने तपासणी करून गळती, यांत्रिक बिघाड आणि सुरक्षिततेच्या त्रुटी दूर कराव्यात, अशी जोरदार मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. "एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे; ती गळकी आणि धोकादायक नसून सुरक्षित आणि विश्वासार्ह असली पाहिजे," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## खिरपाणी धबधबा दुर्घटनेतील मृत आदित्य ओळंबेच्या कुटुंबीयांचे आमदार गजाननभाऊ लवटे यांनी केले सांत्वन

**सा युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे दर्यापूर**

अंजनगाव सुर्जी : मेळघाटातील सातपुडा पर्वतरांगांतील निसर्गरम्य खिरपाणी धबधबा येथे झालेल्या दुर्दैवी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या अंजनगाव सुर्जी येथील मातंगपुरा परिसरातील १६ वर्षीय आदित्य ओळंबे यांच्या कुटुंबीयांची दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. गजाननभाऊ लवटे यांनी सोमवारी सदिच्छा भेट घेऊन सांत्वन केले.यावेळी आमदार लवटे यांनी आदित्यच्या आई-वडिलांसह कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या भावना जाणून घेतल्या. या दुःखद प्रसंगी धीर देत शासनाकडून मिळणारी सर्व मदत मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.कुटुंबीयांच्या मागणीनुसार खिरपाणी धबधबा येथे घडलेल्या संपूर्ण घटनेची पुन्हा सखोल चौकशी करण्यात यावी, यासाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आमदार लवटे यांनी दिल्या.



**खिरपाणी धबधबा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या आदित्य ओळंबे यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेताना दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. गजाननभाऊ लवटे.**

तसेच तहसीलदारांशी संपर्क साधून शासनाच्या नियमांनुसार आदित्यच्या आई-वडिलांना आर्थिक सहाय्य व इतर शासकीय लाभ तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने पाठपुरावा करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी आमदार गजाननभाऊ लवटे म्हणाले, "आदित्यच्या अकाली निधनाने संपूर्ण परिसर शोकाकुल झाला आहे. या कठीण प्रसंगी मी आणि माझे संपूर्ण कुटुंब ओळंबे कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत. शासनाकडून मिळणारी प्रत्येक मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. तसेच माझ्याकडूनही जी काही शक्य ती मदत असेल, ती करण्यासाठी मी सदैव कुटुंबाच्या पाठीशी उभा आहे."आमदार लवटे यांच्या भेटीमुळे दुःखी कुटुंबीयांना भावनिक आधार मिळाला असून, अपघाताची निष्पक्ष चौकशी व शासनाकडून तातडीने मदत मिळण्याबाबत अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर विद्यार्थिनींच्या लाडक्या आंब्रे मॅडम सेवानिवृत्त

## भव्य व भावुक सोहळ्यात घरापर्यंत काढली मिरवणूक !

**सा. युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : कोकण एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमती जा. र. ह. कन्या शाळा, अलिबाग येथील व्यवसाय शिक्षण विभागातील ज्येष्ठ आणि अत्यंत लोकप्रिय शिक्षिका स्नेहल सतीश आंब्रे मॅडम ३१ जुलै रोजी ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाल्या. या निमित्ताने शाळेत एका अत्यंत भव्य, दिव्य आणि भावुक सेवागौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.वर्गात अध्यापन करण्यासोबतच अनेक सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेणाऱ्या आंब्रे मॅडम यांनी कधीही स्वतःला तासिकांपुरते मर्यादित ठेवले नाही. अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी त्यांनी थेट त्यांच्या घरी जाऊन वैयक्तिक मार्गदर्शन केले. त्यांच्या याच मार्गदर्शनामुळे आज अनेक विद्यार्थी उच्च पदांवर कार्यरत असून मॅडम त्यांच्यासाठी मोठ्या प्रेरणास्थान आहेत. एक उत्कृष्ट निवेदिका आणि महिला जनजागृतीपर व्याख्यानांसाठी अलिबागमध्ये प्रसिद्ध वक्त्या असलेल्या आंब्रे मॅडम यांनी अलिबाग पोलीस स्टेशनच्या 'महिला दक्षता समिती'तही



मोलाचे कार्य केले आहे. तसेच 'अंबिका योग कुटीर' व 'पतंजली योगपीठ'च्या माध्यमातून त्यांनी अनेकांना योग प्रशिक्षण दिले आहे. शाळेत आपल्या लाडक्या शिक्षिकेला निरोप देण्यासाठी गेल्या३४ वर्षातील असंख्य माजी विद्यार्थ्यांनी आणि माजी शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. विद्यार्थिनींनी संपूर्ण शाळा रंगीबेरंगी फुगे, फुलांच्या माळा आणि आकर्षक रांगोळी काढून अत्यंत सुंदर सजवली होती. सोहळ्यासाठी येणारे प्रत्येक माजी विद्यार्थिनीचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. आपल्या हृदयातील या लाडक्या शिक्षकेला निरोप देताना सर्वच विद्यार्थिनी आणि शिक्षक कमालीचे भाऊक झाले होते .अनेक माजी विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त करताना आंब्रे मॅडमच्या आणि शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. आपल्या निरोप समारंभातील भाषणात आंब्रे मॅडम आपल्या भावना व्यक्त करताना भाऊक झाल्या होत्या. ज्यांच्यामुळे आपण शिक्षिका बनू शकलो त्या आपल्या आदरणीय दादांना त्यांनी सर्वप्रथम वंदन केले. तसेच आपले वडील दादा मोरे व आई सुनंदा मोरे यांच्यासह आपले गुरु लाभलेले आगलावे सर, खोपकर सर आणि फुलगावकर मॅडम यांच्या विषयी कमालीचा आदर व्यक्त करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले .कोकण एज्युकेशन सोसायटीचे जेष्ठ संचालक आदरणीय संजय भाई पाटील आणि आदरणीय नंदाताई देशमुख यांच्या बद्दलही त्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली. या भव्य सेवा निवृत्ती कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोकण एज्युकेशन सोसायटी जा. र. ह. कन्या शाळा अलिबागच्या प्राचार्या सरला किणी मॅडम होत्या .या संपूर्ण देखण्या कार्यक्रमाची संकल्पना व चोख नियोजन प्राध्यापक संतोष माने यांनी केले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक अनिल राऊत, प्राध्यापक रवी वागळे, प्राध्यापिका सुनंदा आंब्राळे आणि आंब्रे मॅडमची विद्यार्थिनी प्रतिनिधी तथा सामाजिक कार्यकर्ती तपस्वी गोंधळी यांच्यासह अनेक माजी विद्यार्थिनींनी खूप मेहनत घेतली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सुषमा शेडगे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन स्टाफ सेक्रेटरी प्राध्यापक शिरसाठ यांनी केले. शाळेतील अधिकृत निरोप समारंभ संपल्यानंतर एक अभूतपूर्व आणि आदर युक्त सोहळा अलिबागकरांना पाहायला मिळाला. सर्व माजी विद्यार्थिनी शिक्षक, सहकारी स्टाफ उपस्थित मान्यवरांनी मिळून आंब्रे मॅडम यांची शाळेपासून ते थेट त्यांच्या घरापर्यंत भव्य मिरवणूक काढली अत्यंत सन्मानाने वाजत गाजत आणि या मिरवणुकीने मॅडमचा अनोखा गौरव केला. या अभूतपूर्व निरोपाने आंब्रे मॅडम सह उपस्थित प्रत्येकाचे डोळे आनंदाश्रू ने भरून आले होते.

## भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाच्या ३२ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**सा. युवक आधार**

**योगेश पालोदकर छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट व चमकदार कामगिरी करत पुन्हा एकदा ग्रामीण भागाचा डंका वाजवला आहे. या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत विद्यालयाचे विक्रमी ३२ विद्यार्थी गुणवंत ठरले असून, विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

विद्यालयाच्या या यशामध्ये सातवीच्या वर्गातून गणेश सदाशिव शिंदे याने २३८ गुणांची कमाई करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच वैष्णवी सांडू भोजने हिने २३२ गुणांसह द्वितीय, तर देवेंद्र वैजनाथ निकम याने २२८ गुणांसह तृतीय क्रमांक



मिळवला आहे.

त्याचप्रमाणे चौथीच्या वर्गातून रोशनी रावसाहेब चाथे हिने प्रथम तर साक्षी प्रभाकर आकाते हिने द्वितीय क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या प्रमुख मानकऱ्यांसह दिव्या राजू माचवे, आदित्य रामेश्वर काकडे, गौरव देविदास सुसुंद्रे, वेदिका सुनील पंडित, धीरज शिवदास मनगटे, देवराज ज्ञानेश्वर भालकर, योगेश ज्ञानेश्वर शिंदे, समीक्षा संतोष ढोरमारे, वैष्णवी गजेंद्र धारकर, हर्षल ज्ञानेश्वर आग्रे, सुजित काकासाहेब इंगळे, तनिष्का योगेश महाजन, उमेश काकासाहेब बिडवे, अक्षरा किशोर गतकणे, दिव्या संजय भोसले, सौरव मुरलीधर काकडे, सोहम दत्तू साखरे, वरद आजिनाथ गोरे, असीम शेख निसार, समर्थ अर्जुन भानुसे, सृष्टी कृष्णा घोंगटे, आदित्य अनिल कुंभारे, उमरगा हमजे खा पठाण, सोनाक्षी परमेश्वर कुंटे, आर्यन सुनील दुसरिया, भावेश विलास खोमणे आणि रोहित साईनाथ साळवे हे सर्व विद्यार्थी घसघशीत यश संपादन करत गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामागे शाळा प्रशासनाचे नियोजन आणि मार्गदर्शक शिक्षकांचे कठोर परिश्रम मोलाचे ठरले आहेत. नुकत्याच पार पडलेल्या विशेष सत्कार सोहळ्यात या सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. विद्यालयाच्या या उज्ज्वल परंपरेबद्दल सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, श्री. सरोदे, आर. डी. कांबळे, शैलजा दराडे, डॉ. विशाल तायडे, डॉ. सुनीता राठोड, आर. डी. महाजन, आर. व्हि. ठाकूर, आर. फुसे, सुनीता उबाळे, राजू महाजन, दीपक सोनवणे, सुरेश देवरे, दत्तात्रय डोलारे, रायभान जाधव, डी. टी. शिंदे, सचिन कळम, विठ्ठल गव्हाणे, विशाल शिंदे, अंकुश सोनवणे, संदीप खडोळ, वंदना पालकर, सुनीता काकडे आणि शिवाजी गायकवाड आदींसह परिसरातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.


## मुरूड उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

### तांत्रिक त्रुटींची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी

**सा युवक आधार**

**लातूर मोहम्मद पिंजारी** : मुरूड येथे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उभारण्यात येत असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाच्या नव्या इमारतीच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संपूर्ण कामाची स्वतंत्र व निष्पक्ष तांत्रिक चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या बांधकामाची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान इमारतीच्या विविध भागांमध्ये काँक्रीट उखडलेले, भिंती व स्लॅबमध्ये तडे गेलेले, काही ठिकाणी लोखंडी सळई उघडी पडलेली तसेच स्लॅबमधून पाणी गळत असल्याचे निदर्शनास आल्याने बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.काही भागांमध्ये तडे व उघड्या पडलेल्या सळईंवर पॅचवर्क करण्यात आल्याचेही दिसून येत असून, हे दुरुस्तीचे नियमित काम आहे की मूळ बांधकामातील त्रुटी झाकण्याचा प्रयत्न, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तज्ज्ञांकडून तपासणी करण्याची मागणी करण्यात आली




आहे.बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंट, स्टील, विटा व इतर साहित्याचा दर्जा, मंजूर आराखडा, निविदेतील अटी तसेच भारतीय मानक ब्युरो (BIS) च्या निकषांचे पालन झाले आहे का, याचीही सखोल पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी पुढे आली आहे.तज्ज्ञ समितीमार्फत संपूर्ण इमारतीची संरचनात्मक तपासणी, काँक्रीट कोअर टेस्ट, स्टीलची गुणवत्ता चाचणी, बांधकाम साहित्याची प्रयोगशाळा तपासणी तसेच आवश्यकतेनुसार स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. या तपासणीचा अहवाल सार्वजनिक करून वस्तुस्थिती नागरिकांसमोर आणावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.चौकशीत बांधकामातील त्रुटी, निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर अथवा नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित कंत्राटदार, अभियंते, पर्यवेक्षण अधिकारी व इतर जबाबदार व्यक्तींवर प्रचलित कायद्यांनुसार कठोर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.दरम्यान, या प्रकरणात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित यंत्रणांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. संबंधित विभागाने वस्तुस्थिती स्पष्ट करून आवश्यक असल्यास तांत्रिक तपासणी करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## कौशल्य विकास योजनेत ३४.५७ लाखांचा कथित गैरव्यवहार; येवदा पोलिसांत गुन्हा दाखल

**सा युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे प्रतिनिधी**

**दर्यापूर** : राज्य शासनाच्या कौशल्य विकास योजनेच्या अंमलबजावणीत कथित आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. नागपूरस्थित पुष्पांक फाउंडेशन या संस्थेने प्रत्यक्ष प्रशिक्षण न देता शासनाचा निधी उचलल्याचा आरोप असून, या प्रकरणी येवदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार, दर्यापूर तालुक्यातील लेटवाडा येथील के. बालाभाऊ काळे कौशल्य केंद्रामार्फत १५ ते ४५ वयोगटातील सुमारे ४६० युवकांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात प्रशिक्षण न देता ३६० विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी करून शासन निधीचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. या आधारे संस्थेच्या खात्यात ३४ लाख ५७ हजार रुपये जमा झाल्याचे समोर




आले आहे.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन अमरावतीच्या उपआयुक्तांनी डिसेंबर २०२५ मध्ये संबंधित केंद्राची अचानक पाहणी केली. तपासात प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थीच नसल्याचे प्राथमिक निरीक्षण नोंदविण्यात आले. त्यानंतर यवतमाळच्या उपआयुक्तांकडूनही चौकशी करण्यात आली असून, शासनाला अहवाल सादर करण्यात आला आहे.

शासनाच्या आदेशानुसार येवदा पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक प्रमोद गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली

**प्रशिक्षण न देता निधी उचलल्याचा आरोप; प्रकरणाच्या तपासाला वेग, इतर केंद्रांचीही चौकशी होण्याची शक्यता**

**तपासात पुढे काय?**

**अमरावतीच्या उपआयुक्तांकडून अचानक पाहणी.**

**यवतमाळच्या उपआयुक्तांकडून स्वतंत्र चौकशी.**

**बेरोजगार युवकांच्या नावावर निधी उचलल्याचा संशय.**

**इतर प्रशिक्षण केंद्रांतील व्यवहारांचीही चौकशी होण्याची शक्यता.**

पुढील तपास सुरू आहे. या गैरव्यवहारामागील आर्थिक व्यवहार, संबंधित व्यक्ती आणि इतर प्रशिक्षण केंद्रांतील व्यवहारांचीही चौकशी केली जात असल्याची माहिती आहे.

# हरित क्रांतीचा प्रेरणादायी सोहळा !

### कोमनादेवी ऑक्सिजन पार्क, सारडे येथे वृक्षारोपण व कर्तृत्ववानांचा सन्मान उत्साहात संपन्न

**सा. युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**: उरण तालुक्यातील सारडे गावातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पार पडला. काही वर्षांपूर्वी ओसाड असलेला हा डोंगर आज सारडे विकास मंचाच्या अथक परिश्रमातून हजारो वृक्षांनी नटलेला हिरवागार ऑक्सिजन पार्क बनला असून, निसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. या हरित उपक्रमामुळे परिसरातील पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा मिळाली असून, दररोज अनेक नागरिक या पार्कला भेट देत आहेत.

कार्यक्रमादरम्यान सौ. निशा प्रितम म्हात्रे (कोप्रोली) यांच्या हस्ते ऑक्सिजन पार्कमध्ये सातत्याने परिश्रम घेणाऱ्या १२ महिला मजुरांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावाचा गौरव करत त्यांना पुढील कार्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

याच प्रसंगी बॅचलर ऑफ आर्ट्स इन कलिनरी आर्ट्सचे शिक्षण पूर्ण करून दुबई, चीन, मालदीव, श्रीलंका, कतार आणि ओमान या सहा देशांमध्ये कामाचा अनुभव घेऊन परतलेल्या शुभम प्रमोद पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच उरण पूर्व विभागात २४ तास निःस्वार्थ ॲम्ब्युलन्स सेवा देणारे सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी, पोलीस हवालदार विजय पाटील, रमेश घुगरे, स्वप्निल म्हात्रे, माजी सरपंच प्रसाद पाटील, सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पाटील, आदर्श शिक्षक उपेंद्र ठाकूर, निवास गावंड, सौ. निशा प्रितम म्हात्रे, प्रितम म्हात्रे, प्रा. अनिल नायडू, प्रशांत म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, संजीवनी म्हात्रे, नितीन म्हात्रे, गणेश भोईर, कृषी मित्र प्रकाश माळी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, श्री राधाकृष्ण महिला ग्रुप, सारडे विकास मंचाचे सदस्य, महिला मजूर, स्वयंसेवक आणि निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी म्हणाले, "आपण करत असलेले कार्य चुकीचे, वाईट, पाप किंवा खोटे नाही आणि त्यातून कोणालाही त्रास होत नसेल, तर समाजासाठी चांगले कार्य करत राहा." त्यांच्या या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सौ. निशा प्रितम म्हात्रे यांनीही महिला मजुरांच्या जिद्दीचे, कष्टाचे आणि सेवाभावाचे विशेष कौतुक केले. उन्हाळा, पावसाळा किंवा वादळी वाऱ्याची पर्वा न करता त्या स्वतःच्या घरचे कार्य समजून ऑक्सिजन पार्कची सेवा करीत असल्याबद्दल त्यांनी त्यांना सलाम केला.

कार्यक्रमातील उपस्थितांसाठी अजित पाटील यांच्या वतीने अल्पोपहाराची, तर प्रकाश माळी यांनी चहाची व्यवस्था केली. कार्यक्रमाचे प्रभावी आणि ओघवते सूत्रसंचालन चेतन पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सारडे विकास मंचाच्या वतीने सर्व मान्यवर, महिला मजूर, स्वयंसेवक, निसर्गप्रेमी आणि उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. "एक झाड... हजारो श्वास" हा संदेश देत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजातील एकजूट, पर्यावरणाप्रती असलेली बांधिलकी आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम सर्वांच्या सहभागामुळे अत्यंत यशस्वी ठरला.

# जाफ्राबाद तालुक्यातील भारज बुद्रुक येथे डॉ. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य स्मारकाचे अनावरण उत्साहात संपन्न

**सा. युवक आधार**

**ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे, वरूड सर्कल** : जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे डॉ. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त भारज बु येथे डॉ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य दिव्य स्मारक अनावरण सोहळा जिल्हा परिषद सदस्या सौ आशाताई पांडे यांच्या शुभ हस्ते स्मारक अनावरण सोहळा उत्साहात पार पडला असून यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. असून सायंकाळी 5 : 30 मिनिटांनी गावातून डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक शोभा यात्रा काढण्यात आली असून यावेळी महिला मंडळी, तरुण वर्ग ,युवक, ज्येष्ठ नागरिक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले असून यावेळी बँड ,ढोल-ताशांचा गजर, घोषणाबाजी आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात ग्रामस्थ व समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संपूर्ण गावात जयंती उत्सवाचे जल्लोषपूर्ण वातावरण निर्माण झाले असून यावेळी रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विजय नाना परिहार, जिल्हा परिषद सदस्य संतोष पाटील लोखंडे, ॲड. विलास दादा साबळे, कैलास दादा खंदारे, गजानन पाटील लोखंडे, विलास आप्पा शिंदे, विलास पाटील ठाकरे, गजानन काळे, गणेश पाटील (सरपंच, सोनगिरी), बाळू भुते, तुळशीराम पायघन, रामचंद्र तेलंगे (सरपंच, भारज बुद्रुक),

## भव्य मिरवणुकीने जयंती उत्सवाला रंगत; जिल्हा परिषद सदस्या सौ. आशाताई पांडे यांच्या शुभहस्ते स्मारकाचे अनावरण

संजय तेलंगे (पोलीस पाटील), उमेश भैय्या रहेकवार सामाजिक कार्यकर्ते,शोभाताई क्षिरसागर, रफीक टेलर ,उपसरपंच समाधान दामधर, मधुकर गायकवाड ,शंकुतलाबाई गायकवाड, रंगनाथ साबळे, दुर्गाबाई निकाळजे, कल्पनाबाई पायघन, नारायण हुसके, देविदास बोऱ्हाडे, सदाशिव खरात, विठ्ठल सोनूने, शुभम चोरमले,राजू निकाळजे (अध्यक्ष), रामेश्वर निकाळजे (उपाध्यक्ष), सुनील निकाळजे (सदस्य), ज्ञानेश्वर निकाळजे (कोषाध्यक्ष), साहेबराव म्हस्के (पत्रकार), गजानन फलफले (पत्रकार) विजय देशमुख,पत्रकार , विठोबा बेराड, विलास सोनूने ,यांच्यासह अनेक मान्यवर, पत्रकार, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजकार्य आणि परिवर्तनवादी विचारांचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा जतन करण्याचे आवाहन सौ , आशाताई पांडे यांनी केले. जयंतीनिमित्त आयोजित भव्य मिरवणूक, स्मारकाचे अनावरण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून गेला.

# कोमनादेवी ऑक्सिजन पार्क, सारडे येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**सा. युवक आधार**

**एम.डी.भोईर** : उरण तालुक्यातील सारडे गावातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. काही वर्षांपूर्वी या डोंगरावर एकही झाड नव्हते. मात्र, सारडे विकास मंचाच्या अथक प्रयत्नांतून आज येथे हजारो वृक्ष दिमाखात डोलताना दिसत आहेत. या हरित उपक्रमामुळे ऑक्सिजन पार्क निसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र बनले असून, दररोज अनेक नागरिक येथे भेट देत आहेत.

वृक्षारोपण कार्यक्रमानिमित्त सौ. निशा प्रितम म्हात्रे (कोप्रोली) यांच्या हस्ते ऑक्सिजन पार्कमध्ये सातत्याने कार्य करणाऱ्या १२ महिला मजुरांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्याचा हा स्तुत्य उपक्रम ठरला.

याच कार्यक्रमात बॅचलर ऑफ आर्ट्स इन कलिनरी आर्ट्स हे शिक्षण पूर्ण करून दुबई, चीन, मालदीव, श्रीलंका, कतार व ओमान या सहा देशांमध्ये कार्याचा अनुभव घेऊन परतलेल्या शुभम प्रमोद पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच उरण पूर्व विभागात २४ तास ॲम्ब्युलन्स सेवा



देणारे सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी, पोलीस हवालदार विजय पाटील (तळोजा), रमेश घुगरे, स्वप्निल म्हात्रे, माजी सरपंच प्रसाद पाटील (वशेणी), सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पाटील, आदर्श शिक्षक उपेंद्र ठाकूर, निवास गावंड (अध्यक्ष, सुयश क्लासेस, आवरे), सौ. निशा प्रितम म्हात्रे, प्रितम म्हात्रे, प्रा. अनिल नायडू, प्रशांत म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, संजीवनी म्हात्रे, एमडीएस हॉटेलचे मालक नितीन म्हात्रे, गणेश भोईर, कृषी मित्र प्रकाश माळी, रोशन घरत, गजानन ठाकूर, कार्यक्रमाचे निवेदक चेतन पाटील, अजित पाटील, हितेश म्हात्रे, मुकेश म्हात्रे, विनोद पाटील, प्रमोद पाटील, मंगेश पाटील, अतुल पाटील, विनायक गावंड, भावार्थ गावंड, नरदास कोठेकर, रामनाथ पाटील, गणेश पाटील, धनेश गावंड, सुमित पाटील, शुभम पाटील, योगेश माळी, मयूर माळी, सायली नवघरकर, रियांश, आध्या, गौरंग, ऋत्विक, सौरभ, सम्राट, श्री राधाकृष्ण महिला ग्रुप, सुलक्षणा पाटील, भगवती पाटील, कविता गावंड, मंदा ताई, पुष्पा ताई, कल्पना ताई, अर्चना ताई, जागृती ताई, जयश्री ताई, कलावती पाटील, गीता पाटील, कोमल पाटील, सौम्या, प्रिन्स, वेदिका, रुंजल तसेच सारडे विकास मंचाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमातील उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था अजित पाटील यांच्या वतीने करण्यात आली, तर चहाची व्यवस्था प्रकाश माळी यांनी केली. यावेळी सारडे विकास मंचाचे सदस्य आणि अनेक निसर्गप्रेमींनी रोप भेट देऊन वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सुंदर आणि प्रभावी निवेदन चेतन पाटील यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी यांनी उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले, "आपण जे काम करतो ते चुकीचे आहे का? ते वाईट आहे का? ते पाप आहे का? ते खोटे आहे का? आणि त्या कामामुळे कुणाला त्रास तर होत नाही ना? जर यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेल, तर समाजासाठी चांगले कार्य करत राहा." त्यांच्या या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

सौ. निशा प्रितम म्हात्रे यांनीही महिला मजुरांच्या जिद्दीचे, परिश्रमाचे आणि सेवाभावाचे कौतुक केले. उन्हाळा, पावसाळा किंवा वारा यांची पर्वा न करता त्या स्वतःच्या घरचे काम समजून ऑक्सिजन पार्कची सेवा करत असल्याबद्दल त्यांनी त्यांना सलाम केला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, महिला मजूर, स्वयंसेवक, निसर्गप्रेमी आणि नागरिकांचे सारडे विकास मंचाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे अत्यंत यशस्वी ठरला.

# अकरावी प्रवेशाचा 'रेटकार्ड' ...? शिक्षणाचा बाजार तेजीत; हजारो रुपयांच्या वसुलीच्या चर्चेने मालेगाव तालुका हादरला!

**सा. युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम प्रतिनिधी** : मालेगाव राज्य शासनाने अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ताधारित व्हावी, या उद्देशाने सुरू केली. मात्र वाशिम जिल्ह्यातील विशेषतः मालेगाव तालुक्यात या प्रक्रियेबाबत गंभीर चर्चा सुरू असून, काही पालक व विद्यार्थ्यांकडून कमी गुणांच्या विद्यार्थ्यांना पसंतीच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी झाल्याचे बोलले जात आहे.पालकांच्या म्हणण्यानुसार, प्रवेश निश्चित करून देण्याच्या नावाखाली ५,५०० रुपये, ११,००० रुपये, तर काहींकडून तब्बल १७,००० रुपयांपर्यंत अतिरिक्त रक्कम घेतल्याची चर्चा आहे. अनेक पालकांनी




आपल्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि स्थानिक महाविद्यालयातच प्रवेश मिळावा म्हणून आर्थिक भार सहन केल्याचे सांगितले जात आहे.विशेष म्हणजे, काही विद्यार्थ्यांना चांगले गुण असूनही इच्छित महाविद्यालयात प्रवेशासाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम भरावी लागल्याचीही चर्चा पालकांमध्ये आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना मुलांना

> **चौकशीशिवाय सत्य समोर येणार नाही!**
> अकरावी प्रवेश प्रक्रियेत शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त विद्यार्थी किंवा पालकांकडून अतिरिक्त रक्कम आकारण्यात आली आहे का, याची शिक्षण विभागाने तातडीने स्वतंत्र चौकशी करावी. विद्यार्थी व पालकांचे गोपनीय जबाब नोंदवून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी पालक व विद्यार्थी वर्गातून जोर धरत आहे.

दुसऱ्या तालुक्यात शिक्षणासाठी पाठविणे परवडत नसल्याने, कर्ज काढून किंवा व्याजाने पैसे उभे करून स्थानिक महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचेही बोलले जात आहे.ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया गुणवत्ता, आरक्षण व शासनाच्या निकषांवर आधारित असताना अशा प्रकारच्या चर्चेमुळे शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे वरिष्ठ शिक्षण अधिकाऱ्यांनी विद्यार्थी व पालकांशी प्रत्यक्ष संवाद साधून प्रवेशावेळी शासनमान्य शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम आकारण्यात आली का, याची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.जर चौकशीत आर्थिक अनियमितता किंवा नियमबाह्य वसुली आढळून आली, तर संबंधित जबाबदारांवर नियमानुसार कठोर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी पालक व विद्यार्थी वर्गातून होत आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवून अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करण्याची गरज व्यक्त होत आहे.


# अंभईत गावकरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय गोंगे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण संपन्नं

**सा.युवक आधार**

**योगेश पालोदकर छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील अंभई येथील श्री वटेश्वर संस्थान मंदिर परिसरात गावकरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय गोंगे यांच्या वाढदिवसानिमित्ताने विविध प्रकारच्या वृक्षांचे उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत निसर्गाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला होता.

या विशेष कार्यक्रमादरम्यान, बहुगुणी व औषधी गुणधर्मांनी समृद्ध असणाऱ्या 'अर्जुन' (सादोडा) या महत्त्वपूर्ण आयुर्वेदिक वृक्षासह विविध छायादार व फलझाडांचे रोपण करण्यात आले.

यावेळी श्री वटेश्वर संस्थान मंदिर समितीचे कार्यकारी पदाधिकारी, परिसरातील शिक्षक वर्ग, ग्रामस्थ तसेच प्रमुख निसर्ग मित्र मोठ्या संख्येने



उपस्थित होते. यामध्ये निसर्ग मित्र डॉ. विलास दांडगे, सुनील शंकर मांगुळकर, समाधान भुईगळ सर, मोसीन देशमुख, ज्ञानेश्वर घोडके आणि दीपक ताठे आदी मान्यवरांचा प्रामुख्याने सहभाग होता.

उपस्थित सर्व ग्रामस्थ आणि निसर्ग मित्रांनी लागवड केलेल्या रोपांचे संगोपन करून त्यांचे जतन व संवर्धन करण्याची शपथ घेतली. डॉ. दत्तात्रय गोंगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या या स्तुत्य व पर्यावरणपूरक उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## स्पेशल चहा

पावुस धो धो पडत होता
छत्री वा-या बरोबर वाकडी तीकडी झाली होती
आडोशाला आसरा घ्यावा म्हणुन
मी बस्टॉवर गेलो गर्दीत घुसलो
आणि पाऊस कमी झाला
गर्दी आता थोड़ी ओसरली होती
पाऊस आता थांबला होता
गर्दीत भीजलेल माझ ओल चीब अंग
मला अस्वस्थ करत होत
अंगात कुड़कुड़ा भरला होता
थंडी वाजु लागली होती
चहा पीण्याचा मुड़ झाला होता
समोरच चहाची टपरी होती
टपरीवर गेलो ऐवढयात
हलकाच आवाज कानावर आला
बोलो बाबु जी चहा दु
मी त्याच्या कड़े पाहीले समोर मळकट कपड़े काळाकुट माणुस डोक्याला गमछाआबड धोबड शरीर यष्टी बहुतेक भैय्या असावा
मी त्याला हाताने इशारा केला त्याने माचीस दील मी सिगरेट पेटवलआणि एक झुरका मारला आणि माझ लक्ष त्या भैयाकडे गेल तो पावसाच्या पाण्यात चहाच पातेल धुवत होता आणि छपरा वरुन पडनार त्या पावसाच पाणि तो त्या पातेल्यात भरून त्याने ते पातेल शेगडीवर ठेवल आणि त्यात साखर चहा पत्ती टाकुन त्या पातेल्यातच त्याने आपले हात धुतले आणि मी बघतच रहीलो आणि माझा चहा पीण्याचा मुडच गेला आणि मी तीथुन निघालो तर भैया मागुन म्हणाला क्या हुआ बाबुजी तकनीक चहा तो पीकर जाओ आपके लिए हमने स्पेशल चहा बनाया है है एकताच मन मरुन आला मी त्याला हात जोडले आणि मनात म्हणालो जय तुकाराम मुंडे आणि मी काढ़ता पाय घेतला


सुनिल शांताराम पेडुरकर

# एका हाताने कर्जमाफी, दुसऱ्या हाताने 'नमो'चे ६ हजार हिसकावणे म्हणजे शेतकऱ्यांची फसवणूक"

## 'कॉ.महादेव नागरगोजे यांचा सरकारवर घणाघात...'

**सा. युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून एक वर्षासाठी वगळण्याचा निर्णय हा



शेतकरीविरोधी असून राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावा, अशी आक्रमक मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉम्रेड महादेव नागरगोजे यांनी केली आहे. कॉम्रेड नागरगोजे म्हणाले की, "एका हाताने कर्जमाफी देऊन दुसऱ्या हाताने शेतकऱ्यांच्या हक्काचे ६ हजार रुपये कापणे म्हणजे सरकारची दुटप्पी भूमिका आहे. हा निर्णय शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा असून त्यांची उघड फसवणूक आहे." ते पुढे म्हणाले की, कर्जमाफी ही शेतकऱ्यांचा अधिकार आहे, तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजना ही उत्पन्नाला आधार देणारी स्वतंत्र योजना आहे. या दोन्ही योजनांचा एकमेकांशी संबंध जोडून लाखो शेतकऱ्यांना वंचित ठेवणे अन्यायकारक आहे. सरकारने आर्थिक भाराचे कारण पुढे करून शेतकऱ्यांच्या हक्कावर गदा आणू नये. "शेतकऱ्यांच्या खात्यात दोन नमो योजनेचे हप्ते जमा झाले नाहीत. त्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी संभ्रमात असून सरकारने तातडीने प्रलंबित हप्ते जमा करून हा अन्यायकारक निर्णय रद्द करावा. अन्यथा भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील," असा इशाराही कॉम्रेड महादेव नागरगोजे यांनी दिला.

# 450 किमीचा जीवदानाचा प्रवास ! उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या तातडीच्या हस्तक्षेपाने बारामती ते देगलूर मोफत ॲम्ब्युलन्स उपलब्ध

**सा युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या तातडीच्या पाठपुराव्यामुळे नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील रुग्ण हरी किशन हाके यांना बारामती येथून देगलूर (जि. नांदेड) येथे सुमारे 450 किलोमीटर अंतरासाठी मोफत ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली.हाके हे पालखी सोहळ्यासाठी आले असता त्याना त्रास होत असल्याचे बारामती येथील वैद्यकीय आरोग्यमित्र सतीश गावडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना या मदतकार्यात महाराष्ट्राचे आरोग्य राज्यमंत्री प्रकाश आबीटकर,डॉ.श्रीकांत शिंदे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी),शिक्षक पदवीधर मतदारसंघाचे भावी आमदार मंगेश चिवटे,शिवसेना महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष रामहरी राऊत तसेच माळेगाव कारखान्याचे माजी संचालक ॲड.गुलाबराव बाजीराव गावडे (अण्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.उपमुख्यमंत्री कार्यालयातील सहाय्यक नितेश चाबुकस्वार, विनायक जरांडे आणि ओम पालकर यांनी



तत्परतेने पाठपुरावा करून मंगेश चिवटे यांच्या स्वाक्षरीचे सहकार्यपत्र वेळेत उपलब्ध करून दिल्याने मोफतॲम्ब्युलन्सची व्यवस्था शक्य झाली.रुग्णाची प्रकृती लक्षात घेऊन वेळेचे महत्त्व ओळखत करण्यात आलेल्या या तत्पर कार्यवाहीमुळे रुग्णाला सुरक्षितपणे बारामतीहून देगलूर येथे हलविणे शक्य झाले.या मदतीबद्दल रुग्णाच्या नातेवाईकांनी उपमुख्यमंत्री कार्यालयासह सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार मानले.यावेळी सतीश गावडे आणि मयूर सोळसकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचेही रुग्णाच्या नातेवाईकांनी विशेष कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# मालेगावात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीचा जनसागर; भव्य मिरवणुकीने दणाणले शहर, हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग!

**सा. युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम** : मालेगाव साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मालेगाव शहरात शनिवारी अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. ढोल-ताशांच्या गजरात, जयघोष आणि घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. भव्य मिरवणूक, अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन आणि समाजबांधवांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे यंदाची जयंती विशेष आकर्षण ठरली.

मिरवणुकीला शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. नगराध्यक्ष ओमभाऊ खुरसडे, अभिषेकभाऊ मुंदडा, संदीपभाऊ ताजणे तसेच नगरपंचायतीचे नगरसेवक यांनी मिरवणुकीत सहभागी होत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन केले. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा आणखी वाढली.

शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक




आणि समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अमर रहे" अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. मिरवणुकीदरम्यान सर्वत्र शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साहाचे दर्शन घडले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक समितीने विशेष परिश्रम घेतले. संजय गायकवाड, संतोष पांढरे, शिवाजी ताकतोडे, संजय गायकवाड (पेंटर), प्रकाश गायकवाड, गणेश मानमोठे, राहुल थोरात, आकाश गायकवाड, भूषण साठे, रवी जाधव, रितिक बाजड, यश बाजड, आकाश बांगरे, सुमित देवकते, संतोष बाजड आणि संतोष गायकवाड यांनी मिरवणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून बहुजन समाजाला नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा आणि समाजात समता, बंधुता व सामाजिक न्यायाची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने हा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

"अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजासाठी आजही प्रेरणादायी" लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य आणि शाहिरीच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाला आवाज दिला. त्यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून सामाजिक ऐक्य, शिक्षण आणि प्रगतीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

# निसर्गातील स्वयंप्रकाशी



सूर्य हा निसर्गातील सर्वात मोठा स्वयंप्रकाशी स्रोत असला, तरी त्याच्याशिवायही निसर्गात अनेक जीव आणि बुरशी स्वतःचा प्रकाश निर्माण करतात. काजव्यांच्या लुकलुकत्या रोषणाईपासून ते समुद्राच्या अथांग गाभाऱ्यातील प्रकाशमान जिवांपर्यंत 'बायोल्युमिनसेन्स'चे हे अद्भुत जग विज्ञानाइतकेच रोमांचक आहे.

निसर्गातील स्वयंप्रकाशी म्हटल्यावर कोणालाही चटकन फक्त सूर्याचेच नाव आठवले तर त्यात चूक काहीच नाही. आपल्या ग्रहमालेतील एकमेव तारा असलेला सूर्य त्याच्या प्रकाशाने आपल्या पृथ्वीला तर उजळून टाकतोच, शिवाय पृथ्वीचा उपग्रह असलेल्या चंद्रालाही प्रकाशमान करतो. त्यामुळे आपल्यासाठी स्वयंप्रकाशी हे विशेषण फक्त सूर्यालाच लावले जाते. मात्र या सूर्यप्रकाशामुळे पृथ्वीवर निर्माण झालेल्या सृष्टीत, या निसर्गात याच सूर्याचे अगदी लहान स्तरावरील प्रतिस्पर्धी निर्माण झालेले आहेत जे स्वतःपुरता का होईना पण थोडासा प्रकाश निर्माण करू शकतात. आता हे वर्णन वाचल्यावर मात्र पावसाळ्याच्या सुरुवातील अवतिर्ण होणारे आणि आपल्या चमचमत्या प्रकाशाची रोषणाई करून निसर्गातील झाडांना लायटिंग करणारे काजवे नक्की आठवले असतीलच.

काजवे हे बीटल्स म्हणजे ढाल किड्यांच्या गटाचे सभासद आहेत. कॉलिओप्टेरा गणात (ऑर्डर) येणाऱ्या या किटकांच्या सुमारे दोन हजार जाती जगभरात आढळतात आणि त्यातल्या बहुसंख्य प्रकाशमान होणाऱ्या असतात. त्यांच्या कुळाचे म्हणजे फॅमिलीचे नावच 'लॅम्पिरिडे' म्हणजे 'शायनिंग फायर' असे आहे. इतर अनेक किटकांप्रमाणे काजव्यांच्याही 'अंडी, अळी, कोश आणि कीटक' अशा चार अवस्था असल्या तरी यातील अळी आणि प्रौढ कीटक अवस्थेतच ते स्वयंप्रकाशी असतात. उत्क्रांतीच्या चक्रामध्ये 'लॅम्पिरिडे' कुळातील अळयांना हा प्रकाश लाभला तो एक प्रकारे धोक्याचा इशारा म्हणून- 'या अशा प्रकाशमान अळया खाण्यास योग्य नाहीत' हे इतर किटकांना समजण्यासाठी पण पुढे प्रौढावस्थेत जोडीदारांना आकर्षित करण्यासाठी या प्रकाशाचा उपयोग होईल म्हणून मग प्रौढ किटकांनाही हा प्रकाश लाभला. सर्वसाधारणपणे काजव्याचे नर आणि मादी दोघेही स्वयंप्रकाशी असतात, मात्र नरांना पंख असतात, त्यांचे डोळे पूर्ण विकसित झालेले असतात, तर माद्यांना पंख नसतात, त्यांचे डोळे कमी विकसित असतात. काजव्यांचा प्रकाश पांढरा, पिवळा, नारिंगी, हिरवा, तांबडा किंवा निळा असतो. काजव्यांच्या शरीरात हा प्रकाश 'बायोल्युमिनसेन्स' या रासायनिक प्रक्रियेमुळे तयार होतो. ही प्रक्रिया काही सागरी जीवांमध्ये आणि फंगी म्हणजे बुरशीमध्येही पाहायला मिळते. काजव्यांच्या पोटावर आतल्या बाजूला प्रकाशपेशींचा जाडसर स्तर असतो, या पेशींमध्ये ल्युसिफेरिन नावाचे रसायन असते. हे रसायन ल्युसिफेरेज विकरांच्या सान्निध्यात ऑक्सिजनशी संयोग पावते आणि हा प्रकाश निर्माण होतो. मात्र अन्य प्रकाशासारखा (सूर्यप्रकाश किंवा लाकडे जाळून मिळणारा प्रकाश) हा उष्ण नसतो. काजव्यांचा प्रकाश थांबून थांबून पडतो. त्यामुळे एकाचवेळी हजारो काजवे प्रकाशमान झाले की तो परिसर लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या रोषणाईने उजळल्यासारखा दिसतो. प्रौढ काजव्यांना सहसा अन्नाची आवश्यकता नसते, मात्र काजव्यांच्या अळया प्रामुख्याने गोगलगाई खातात. नर मादीचे मिलन झाल्यानंतर नर मरण पावतात. मादी अंडी घालून मरते, त्यातून २० दिवसांनी अळया बाहेर येतात. अळयांची वाढ संथ गतीने-वर्ष-दीड वर्षाच्या काळात होते. नंतर त्या कोशावस्थेत जातात. कोशातून प्रौढ कीटक दोन एक आठवड्यात बाहेर येतात आणि आपल्या प्रकाशाने जोडीदाराला आकर्षित करू लागतात.

निसर्गातील आणखी एक स्वयंप्रकाशी गोष्ट म्हणजे काही विशिष्ट जातीच्या फंगी अर्थात बुरशी. विशेषतः भरपूर पावसाच्या प्रदेशांमधील झाडांच्या खोडावर, ओंडक्यांवर वाढणाऱ्या बुरशीमधील काही प्रकार हे 'बायोल्युमिनसेन्स' म्हणजे स्वयंप्रकाशी प्रकारातले असतात. महाराष्ट्रातील आंबोली, भीमाशंकर, माथेरान, महाबळेश्वर, वानोशी, तिलारी येथील जंगलामध्ये ही रात्रीच्या अंधारात मंदपणे चमकणारी बुरशी पाहायला मिळते. जगभरात अशा बायल्युमिनसेंट फंगीचे सुमारे १०५ प्रकार आजपर्यंत नोंदवण्यात आलेले आहेत. 'अगॅरिकल्स' या ऑर्डरमध्ये प्रामुख्याने अशा चमकणाऱ्या स्वयंप्रकाशी बुरशीचा समावेश होतो. यातील 'जॅक ओ लॅन्टर्न' मशरुम ही विषारी (खाण्यास अयोग्य) असते. त्यामुळेच काजव्यांच्या अळयांच्या बाबतीत त्यांचा प्रकाश जसा धोक्याचा इशारा असतो तसाच या मशरुम्ससाठीही असतो असं म्हणता येईल. काजव्यांप्रमाणे या बुरशीचा प्रकाश लुकलुकणारा नसतो तर कायम असतो, मात्र हा मंद हिरवा प्रकाश पाहायला डोळे सरावलेले असावे लागतात. या स्वयंप्रकाशी बुरशीला आपले परागीभवन घडवून आणण्यासाठी किटकांना आकर्षित करायला हा प्रकाश उपयोगी पडतो.

स्वयंप्रकाशी प्राण्यांमध्ये सागरातील काही जीवांचा समावेश होतो. स्क्विड, काही प्रकारचे मासे, सी ककुंबर याबरोबर सागरातले काही सूक्ष्म जीवही प्रकाशमान असतात. याचं एक अनोखं उदाहरण म्हणजे 'अॅन्गलर फिश' हा मासा. या माशाच्या डोक्यावर एखाद्या लटकत्या काठीसारखा एक अवयव असतो. या माशांमधल्या फक्त मादी माशांकडेच प्रकाशमान होण्याची क्षमता असते. या माद्या तरुण असताना प्रकाशमान नसतात. तेव्हा त्या सागराच्या पाण्यातील स्वयंप्रकाशी बॅक्टेरियांना आकर्षित करून आपल्या कल्ल्यांमध्ये जागा देतात. या बॅक्टेरियांना पुरेसे अन्न आणि ऑक्सिजन पुरवून सांभाळतात. त्यामुळे या स्वयंप्रकाशी बॅक्टेरियाच्या मदतीने त्यांना आयते दिवेच मिळतात, ज्याच्या प्रकाशात त्यांना अन्न शोधणे सोपे जाते. सागरातील 'जेली फिश'देखील स्वयंप्रकाशी असतात. जगभरात सापडणाऱ्या जेली फिशच्या एकूण प्रकारांपैकी सुमारे पन्नास टक्के जेली फिश बायल्युमिनसेंट असतात. 'पोर्तुगीज मॅन ऑफ वॉर', 'मेड्युसा' असे काही प्रकार त्यांच्या आकर्षक प्रकाशासाठी प्रसिद्ध आहेत. प्रकाशनिर्मितीसाठी त्यांना त्यांच्या शरीरातील काही खास प्रकारच्या पेशी आणि प्रोटिन्सची मदत होते. जेली फिशच्या शरीरात असलेल्या ल्युसिफेरीनचा ऑक्सिजनशी संयोग झाला की प्रकाश निर्मिती होते. जेली फिशच्या जातींनुसार या प्रकाशाचा रंग बदलतो. जेली फिश निळसर किंवा हिरवट रंगाचा प्रकाश निर्माण करताना दिसतात. कारण हेच रंग खोल सागरातील पाण्यात दूरपर्यंत पोहोचू शकतात. सागराच्या अंतर्भागातील अंधारात भक्ष्याला आकर्षित करणे, जोडीदार मिळवणे, शिकाऱ्यांपासून बचाव करणे अशा विविध कारणांसाठी या प्रकाशाचा वापर केला जातो. समुद्राच्या पृष्ठभागाखाली हजारो किलोमीटर आतमध्ये जिथे सूर्याचे किरण पोहोचूच शकत नाहीत तिथे जेली फिश आपल्या प्रकाशाने जणू उजेड पसरवतात.


त्यामुळे महासागरापासून ते जंगलातल्या लाकडाच्या ओंडक्यापर्यंत निसर्गातील स्वयंप्रकाशी गोष्टी पाहायला मिळू शकतात, मात्र त्यासाठी तुमच्याकडे ती नजर हवी आणि निसर्गाशी जवळीक हवी.

**मकरंद जोशी**
**निसर्ग अभ्यासक व लेखक**

---

## ChatGPT वापरताना 'या' चुका पडू शकतात महागात; प्रत्येक युजरने एकदा वाचाच!

डिजिटल युगात ChatGPT आणि इतर AI टूल्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. अभ्यास, ऑफिसचे काम, ई-मेल लिहिणे, भाषांतर, कंटेंट तयार करणे अशा अनेक गोष्टी AI काही क्षणांत करून देते. मात्र, AI जितके उपयुक्त आहे तितकेच त्याचा वापर करताना काही मूलभूत गोष्टींची काळजी घेणेही आवश्यक आहे. अनेकजण नकळत वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती AI मध्ये टाइप करतात, ज्यामुळे गोपनीयतेचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ChatGPT वापरताना कोणती माहिती कधीही शेअर करू नये, ते जाणून घेऊया.




**१) पासवर्ड, OTP**

कोणत्याही बँक खात्याचा, ई-मेलचा, सोशल मीडिया अकाउंटचा पासवर्ड, OTP, ATM PIN किंवा सुरक्षा कोड कधीही AI मध्ये लिहू नका. अशी माहिती नेहमी गोपनीय ठेवा.

**२) बँकिंग माहिती**

डेबिट किंवा क्रेडिट कार्ड क्रमांक, CVV, UPI PIN, नेट बँकिंग लॉगिन, खाते क्रमांक किंवा आर्थिक व्यवहारांशी संबंधित संवेदनशील माहिती शेअर करणे टाळा.

**३) आधार, PAN**

आधार कार्ड, PAN कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदार ओळखपत्र किंवा इतर सरकारी कागदपत्रांचे पूर्ण तपशील किंवा स्पष्ट फोटो अपलोड करू नका.

**४) वैद्यकीय आणि वैयक्तिक कागदपत्रे**

मेडिकल रिपोर्ट, लॅब टेस्ट, पगाराची स्लिप, आयकराशी संबंधित कागदपत्रे किंवा इतर संवेदनशील फाइल्स शेअर करण्यापूर्वी त्यातील वैयक्तिक माहिती हटवणे योग्य ठरते.

**५) ऑफिसची गोपनीय माहिती**

कंपनीचे करार, ग्राहकांचा डेटा, अंतर्गत दस्तऐवज, गोपनीय प्रोजेक्ट्स, पासवर्ड किंवा व्यावसायिक गुपिते AI मध्ये टाकू नका. त्यामुळे कंपनीच्या गोपनीयतेवर परिणाम होऊ शकतो.

६) वैयक्तिक संपर्क माहिती

पूर्ण घराचा पत्ता, मोबाईल क्रमांक, वैयक्तिक ई-मेल, जन्मतारीख किंवा तुमची ओळख सहज पटेल अशी माहिती शेअर करणे टाळा.

७) इतरांची खासगी माहिती

कुटुंबीय, मित्र, सहकारी किंवा ग्राहकांची परवानगीशिवाय त्यांची वैयक्तिक माहिती, फोटो, कागदपत्रे किंवा संपर्क तपशील AI मध्ये शेअर करू नका.

८) कायदेशीर किंवा अतिसंवेदनशील दस्तऐवज

वसीयत, न्यायालयीन कागदपत्रे, गोपनीय करार, मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे किंवा इतर महत्त्वाचे कायदेशीर दस्तऐवज अपलोड करण्यापूर्वी काळजी घ्या आणि शक्य असल्यास वैयक्तिक तपशील हटवा.

**सुरक्षित वापरासाठी काही सोप्या टिप्स**

– आवश्यक तेवढीच माहिती द्या.


– नाव, पत्ता, खाते क्रमांक यांसारखे तपशील शक्य असल्यास हटवा किंवा बदलून लिहा.

– महत्त्वाची कागदपत्रे अपलोड करण्यापूर्वी दोनदा तपासा.

---

## फिट हार्ट, हेल्दी लाइफ! रोजच्या जीवनातील 'या' सवयी हृदयासाठी ठरतील वरदान

आजकाल हृदयाशी संबंधित आजारांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. वाढता ताण, अनियमित दिनचर्या, जंक फूडचे वाढते सेवन आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे तरुणांमध्येही हृदयविकाराच्या समस्या दिसून येत आहेत. मात्र, दैनंदिन जीवनातील काही साध्या पण सातत्यपूर्ण सवयी अंगीकारल्यास हृदय निरोगी ठेवण्यासाठी मदत होऊ शकते. योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी यामुळे देखील अनेक गंभीर आजारांचा धोका कमी होण्यास मदत होतो. हृदय निरोगी ठेवण्यासाठी कोणत्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत, जाणून घ्या.



**संतुलित आहाराला द्या प्राधान्य**

हृदय निरोगी ठेवण्यासाठी आहार हा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो. रोजच्या जेवणात ताजी फळे, हिरव्या पालेभाज्या, संपूर्ण धान्ये, कडधान्ये, ड्राय फ्रुट्स आणि बिया यांचा समावेश करावा. ओमेगा-३ फॅटी ॲसिडयुक्त पदार्थ, कमी फॅटचे दुग्धजन्य पदार्थ आणि पुरेशा प्रमाणात पाणी पिण्याची सवयही फायदेशीर ठरते. यामुळे रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारते आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहण्यास मदत होते.

**दररोज शरीराची हालचाल आवश्यक**

हृदय मजबूत ठेवण्यासाठी नियमित व्यायाम अत्यंत महत्त्वाचा आहे. दररोज किमान ३० ते ४० मिनिटे वेगाने चालणे, सायकल चालवणे, योगा, पोहणे किंवा हलका व्यायाम केल्यास रक्ताभिसरण सुधारते. यामुळे वजन नियंत्रणात राहते आणि रक्तदाब संतुलित राहण्यास मदत होते तसेच हृदयावर अतिरिक्त ताण येत नाही.

**तणाव कमी करा आणि झोप पूर्ण घ्या**

सततचा मानसिक तणाव आणि अपुरी झोप हृदयाच्या आरोग्यावर परिणाम करू शकते. दररोज सात ते आठ तास शांत आणि गाढ झोप घेणे आवश्यक आहे. ध्यान, प्राणायाम, योगा किंवा आवडत्या छंदासाठी वेळ दिल्यास मन शांत राहते आणि तणाव कमी होतो. मानसिक आरोग्य चांगले असेल तर त्याचा सकारात्मक परिणाम हृदयावरही होतो.

**वाईट सवयींपासून ठेवा अंतर**

धूम्रपान, तंबाखूचे सेवन, मद्यपान, जास्त मीठ, साखर आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे वारंवार सेवन हृदयासाठी हानिकारक ठरू शकते. तसेच दीर्घकाळ एकाच जागी बसून काम करण्याऐवजी प्रत्येक काही वेळाने उठून चालण्याची सवय लावणे गरजेचे आहे.

**नियमित आरोग्य तपासणी करा**

उच्च रक्तदाब, मधुमेह आणि वाढलेले कोलेस्टेरॉल ही हृदयविकाराची प्रमुख कारणे मानली जाते. त्यामुळे वेळोवेळी रक्तदाब, रक्तातील साखर आणि लिपिड प्रोफाइल तपासून घेणे आवश्यक आहे. छातीत दुखणे, धाप लागणे, अनियमित हृदयाचे ठोके किंवा अचानक थकवा जाणवत असल्यास दुर्लक्ष न करता त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

---

## नाचणीत दडलंय दूधाहून जास्त कॅल्शियम अशाप्रकारे डाएटमध्ये करा सामील, हाड होतील लोखंडासारखी मजबूत

हाडांच्या कमजोरीमुळे सांधेदुखी, पाठदुखी यांसारखे आजार सतावू लागतात. हाडांना मजबूत करण्यासाठी फक्त दूधच नाही तर नाचणीचे सेवन देखील खूप फायद्याचे मानले जाते. यापासून वेगवेगळे स्वादिष्ट पदार्थ तयार करुन तुम्ही नाचणीचा आपल्या आहारात समावेश करु शकतो.नाचणीमध्ये कॅल्शियम, आयर्न आणि फायबर मुबलक प्रमाणात असल्याने हाडे मजबूत ठेवण्यास मदत होते.रोजच्या आहारात नाचणीचा दलिया, भाकरी, डोसा किंवा सूपच्या स्वरूपात सहज समावेश करता येतो.



लहान मुले, महिला आणि हाडांचे आरोग्य जपणाऱ्या व्यक्तींसाठी नाचणी हा पौष्टिक व आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. हाडं मजबूत असतील तर शरीर मजबूत राहिल. बऱ्याचदा आपल्याला सांधेदुखी, पाठदुखी अशा समस्या जाणवत असतात. याचे मूळ कारण म्हणजे हाडं ठिसूळ होणे. लहानपणापासून हाडांना मजबूत करण्याचे दूधाचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. दूधात कॅल्शियमचे चांगले प्रमाण असते ज्यामुळे हाडं मजबूत होण्यास मदत होते. पण तुम्हाला माहिती आहे का? दूधाहून जास्त कॅल्शियम हे आपण खात असलेल्या एका नेहमीच्या धान्यात आढळून येते. हे धान्य म्हणजे नाचणी. स्नायू आणि मज्जासंस्थेच्या योग्य कार्यासाठी शरीराला कॅल्शियमची गरज असते आणि हे कॅल्शियम नाचणीमध्ये सर्वाधित आढळून येते. यामुळे आपल्या हाडांना जर तुम्हाला मजबूत बनवायचं असेल तर आहारात नाचणीचा समावेश करणे तुमच्यासाठी खूप फायद्याचे ठरु शकते. चला रोजच्या आहारात नाचणीचा कशाप्रकारे समावेश केला जाऊ शकतो ते जाणून घेऊया.

**नाचणीचा दलिया**

सकाळच्या नाश्त्यासाठी तुम्ही नाचणीचा दलिया तयार करु शकता. याला पाणी किंवा दूधात शिजवून नंतर गूळ आणि ड्रायफ्रुट्ससोबत मंद आचेवर शिजवावे. नाचणीचा हा गोड दलिया चवीला छान लागतो आणि हाडांना कॅल्शियम, फायबर, ऊर्जा मिळवून देण्यास मदत करतो.

**नाचणीची भाकरी**

नाचणीचा रोजच्या आहारात समावेश करण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. यासाठी नाचणीचे पीठ दळून किंवा बाजारातून विकत घ्या. रोज दिवसातून एकदा तरी आपल्या आहारात नाचणीच्या भाकरीचा समावेश करा. ज्वारी-बाजरीप्रमाणेच तुम्ही नाचणीच्या पिठाचीही थापून भाकरी तयार करु शकता. यामुळे शरीरात भरपूर कॅल्शियमचा साठा पोहचेल.

**नाचणीचा डोसा**

सकाळच्या नाश्त्यात डोसा अनेकांना खायला फार आवडतो. सामान्यपणे हा डोसा तांदळाच्या पिठापासून तयार केला जातो. पण तुम्हाला माहितीये का? नाचणीच्या पिठापासूनही मऊ आणि कुरकुरीत असा डोसा तयार केला जाऊ शकतो. हा नाश्त्यासाठीचा एक हेल्दी आणि टेस्टी पर्याय ठरेल. तुम्ही मुलांच्या टिफीनमध्येही या पदार्थाचा समावेश करु शकता.

**नाचणीचे सूप**

पावसाळयात सूपाचे सेवन मनाला वेगळाच आनंद देऊन जाते. तुम्ही अनेकदा भाज्यांचे किंवा चिकनचे सूप पिले असेल पण यावेळी घरी पौष्टीक नाचणीचे सूप पिऊन पाहा.

---

## ब्रोकोलीपासून फक्त सलाडच नाही तर बनवा हे चविष्ट पदार्थ

ब्रोकोली ही एक पोषकतत्वांनी समृद्ध भाजी आहे. यामध्ये व्हिटामिन सी, व्हिटामिन के, फोलेट, फायबर, पोटॅशियम असतात. अनेकजण ब्रोकोलीचं सेवन डाएटद्वारे करतात. तिच्या सौम्य चवीमुळे आणि कुरकुरीत टेक्स्चरमुळे लहानपासून मोठ्यांपर्यंत हल्ली आहारात ब्रोकोलीचा समावेश करण्याचे प्रमाण वाढत आहे. आज आपण ब्रोकोली सलाडशिवाय आणखी कोणत्या पद्धतीने खाऊ शकता यावर एक नजर टाकूया,



**ब्रोकोली सूप**

पावसाच्या दिवसांत गरमागरम ब्रोकोली सूप एक उत्तम पर्याय आहे. ब्रोकोली, कांदा, लसूण आणि थोडे दूध किंवा बटर एकत्र उकडून त्याची मिक्सरमध्ये प्युरी बनवा. त्यात काळीमिरी पूड आणि मीठ घालून उकळू द्या. हे सूप पचनासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

**ब्रोकोली पराठा**

गव्हाच्या पिठात ब्रोकोलीचा किस, हिरवी मिरची, कोथिंबीर, जिरे आणि चवीनुसार मसाले घालून कणीक मळून पराठे लाटून घ्या. हा पराठा लहान मुलांच्या टिफिनसाठी उत्तम पर्याय ठरतो.

**ब्रोकोली टिक्की**

उकडलेले बटाटे, किसलेली ब्रोकोली, पनीर, हिरवी मिरची आणि चवीनुसार मसाले एकत्र करून टिक्कीचा आकार द्या. थोडे तेल लावून तव्यावर शॅलो फ्राय करा. पुदिन्याची चटणी किंवा टोमॅटो सॉससोबत आनंद घ्या.

**ब्रोकोली-पनीर भुर्जी**

ब्रोकोली बारीक चिरून किंवा किसून घ्या. कढईत तेल, जिरे, कांदा, टोमॅटो आणि मसाले परतवून त्यात ब्रोकोली व किसलेले पनीर घाला. ५ मिनिटांत तयार होणारी ही भुर्जी चपाती किंवा पावासोबत नक्की खा.

**स्टिर-फ्राय ब्रोकोली**

डाएट करणाऱ्यांसाठी हा एक सर्वोत्तम पर्याय आहे. कढईत थोडे ऑलिव्ह ऑईल किंवा बटर घेऊन त्यात लसूण, ब्रोकोली, सिमला मिरची आणि पनीर परतून घ्या. वरून थोडे मीठ, काळीमिरी आणि चिली फ्लेक्स टाका.